डॉ. मनोहर सुरवाडे

बाप

नाण्याच्या दोन बाजू

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

बाप :
नाण्याच्या दोन बाजू

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

बाप : नाण्याच्या दोन बाजू

लेखक: डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर जि.
जळगाव,४२५५०३
वैशाली नगर, फैजपूर, जि. जळगाव,
४. मोबाइल ९९७०११७४३९
५. ई-मेल : msurwade09@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ४ जानेवारी २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. मनोहर झगडू सुरवाडे - ९९७०११७४३९

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

प्राध्यापक, विभागप्रमुख व उपप्राचार्य

- **सामाजिक व शैक्षणिक कार्य**

१. **पीएचडी :** 'मराठवाड्यातील कथाकारांचे प्रादेशिक वेगळेपण', स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००३

२. संशोधन प्रकल्प

२.१ - समकालीन दलित कथेतील सामाजिक जाणिवा, यु.जी.सी., पुणे विभाग,२००४

२.२ - भटक्या विमुक्तांच्या मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, यु.जी.सी., नवी दिल्ली, २०१४

३. शोधनिबंध

३.१ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : अक्षरवैदर्भी, ऑक्टो-नोंव्हे. २०१०

३.२ - दलितेतर लेखकांच्या कथांमधील दलित जीवनदर्शन : अस्मितादर्श,एमेजू, २०१०

३.३ - मराठवाड्याच्या कथांतील आशयसूत्रे : अनुबंध, एप्रिल, २०११

३.४ - आदिवासी काव्यातील सामाजिक आणि वाङ्मयीन जाणिवा : अक्षरवैदर्भी, मे, २०११

३.५ - मराठवाड्याच्या कथांतील दुष्काळविषयक आशयसूत्रे : आत्मप्रत्यय, ऑक्टो- डिसे., २०११

३.६ - संत साहित्यातील दुष्काळाचे संदर्भ : पंचधारा, ऑक्टो-डिसे,२०११

३.७ -आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचारदर्शन :अस्मितादर्श,२०१२

३.८-स्त्रियांचे सक्षमीकरण आणि त्यांचे अधिकार:प्लाटीनम,एप्रिल, २०१२

३.९-दलित चळवळ आणि आत्मकथन: एक अनुबंध:आधार,सप्टे.२०१२

३.१० - साहित्यातील गांधीविचार : अक्षरवैदर्भी, नोव्हें २०१२

३.११- उन्नती चौधरी लिखित 'स्त्रीत्त्वाची सूत्रे' : स्त्रीस्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा शोध घेणारा नाविन्यपूर्ण काव्याविष्कार, अक्षरवैदर्भी दिवाळी विशेषांक, २०२४

३.१२- नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा **:** Conference Sovenier**,** दारापूर, २०११

४. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर : एकूण -१५

५. संपादित पुस्तकांतील लेख

५.१'राघववेळ आणि तणकट' या कादंबऱ्यातील ग्रामीणता:ग्रंथवेद,२०१२

५.२ - स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी कादंबरीतील मानवतावादी दृष्टिकोन : मराठी साहित्यातील मानवतावाद, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२

५.३ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : १९८० नंतरचे मराठी साहित्य, ----२०१२

५.४ 'गावरंग' माणदेशी माणसांची बदलती जीवनशैली : कृष्णाक्षर,२०१५

५.५- लोकमान्य टिळक यांच्या लेखनातील दुष्काळविषयक संदर्भ आणि दृष्टिकोन : मराठी साहित्य आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन,---- २०१६

५.६- १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास पूरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ : १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना, --- २०१७

६ - प्रकाशित पुस्तके

- **कवितासंग्रह**

१- षटकार : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

२- पुरुषनामा : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

३- तो-ती-ते : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

४-पुरुषाच्या व्यथा : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

- **कथासंग्रह**

१. खूळ : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

२. शापित : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

- **संपादन**

१. नकलाकार दिलीप अलोणे गौरवग्रंथ : ईसाहित्य प्रतिष्ठान, ठाणे,२०२५

- **साहित्य : समीक्षा व संशोधनपर ग्रंथ**

१ - समकालीन दलित कथा : हार्मिस प्रकाशन, पुणे, २००८

२ - १९८० नंतरची ग्रामीण कथा : बळीवंश प्रकाशन, नांदेड, २०१०

३ - साठोत्तरी साहित्य प्रवाह: विविधता आणि वेगळेपण : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

४ - स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्यातील सामाजिक संदर्भ : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

५ - ग्रामीण समाज आणि कथासाहित्य:सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

६ - आदिवासी साहित्य प्रवाह : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

७ - दलित आत्मकथा आणि कथा : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

८ - ग्रामीण साहित्यप्रकार : स्वरूप आणि चिकित्सा, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

९ - मराठी ग्रामीण कथा- लेखिकांचे योगदान : स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,२०१३

१०- उन्नती चौधरी लिखित-'साहित्य आणि समाजशास्त्रीय संशोधन' (सहलेखक) : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०२३

७. पीएच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

८. संशोधन विद्यार्थी : १२ विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त

९. विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. प्रबंधांचे बहि:स्थ परीक्षक

१०. सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनपर व्याख्याने

११. जळगाव विद्यापीठस्तरीय विविध समित्यांवर शैक्षणिक कार्य

१२. पुरस्कार -

१- महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, २००९

२- भीमरत्न पुरस्कार, सम्राट फाउंडेशन, सावदा, जि. जळगाव,२०१३

३- १९८० नंतरची ग्रामीण कथा, या शोधग्रंथास तीन राज्यस्तरीय पुरस्कार,२०११

४- आदर्श शिक्षक पुरस्कार, युनियन बँक ऑफ इंडिया, २०१०

५- टीचर एक्सलंट अवार्ड, लोकमत वृत्तपत्र समूह, २०२५

*** *** ***

मनोगत - - -

'बाप' हे एक नातं असून सामाजिकदृष्ट्या एका स्त्रीशी विवाह केलेला पुरुष असतो, तो तिचा पती असतो. त्यांना मुलं झाले की, तो मुलांचा बाप बनतो. हा बाप म्हणजे कुटूंबकर्ता पुरुष. घरात आणि घराबाहेर तो अनेक रुपांमध्ये प्रकट होत असतो. सामाजिक आणि नैसर्गिकदृष्ट्या त्याच्या काही प्रतिमा तयार झालेल्या असतात. त्यात त्याचे मानसशास्त्र दडलेले असते; परंतु प्रत्येक जण एकसारखा नसतो. त्याचा स्वभाव, गुणलक्षणं आणि दृष्टिकोन हे 'व्यक्ती तितक्या प्रकृती' याप्रमाणे भिन्न असतात. व्यक्तीच्या नैसर्गिक आणि सामाजिक प्रवृत्तीनुसार विचार केला, तर बाप या नात्याचे संबोधन 'टॉस'सारखे असते. म्हणजे दोन बाजू, दोन चेहरे प्रत्येकाला असतात.

नाण्याला 'छापा आणि काटा' अशा दोन बाजू असतात. 'टॉस'चा अर्थ क्रिकेट खेळाच्या वेळेस नाणेफेक किंवा नाणे हवेत उडवण्याची क्रिया असा होतो. या क्रियेद्वारे खेळाच्या सुरुवातीला कोणती टीम प्रथम फलंदाजी किंवा गोलंदाजी करणार, हे ठरवले जाते. शक्यतो सगळ्यांचे लक्ष 'छापा'(हेड) याकडे असते. ती आवडीची आणि आकर्षक बाब असते. काटा(टेल) नकोसा वाटतो. पुरुषाची अशीच एक बाजू छाप्यासारखी असते, तर दुसरी बाजू काट्यासारखी असून ती कोणालाही नकोशी वाटते. अशा दोन भिन्न प्रवृत्तीच्या, स्वभावाच्या बापांचे(पुरूषांचे) चित्रण या काव्यसंग्रहातून केलेले आहे. अर्थात चांगल्या आणि वाईट कुटूंबकर्त्या पुरुषांचे अर्थात पितृसत्ताक कुटूंबपद्धतीतील 'बाप' म्हणून त्यांचे दर्शन **बाप : नाण्याच्या दोन बाजू** यातून घडविण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रकाशित केल्याबद्दल सामंत सर आणि त्यांच्या ई-साहित्य समूहाचे मनःपूर्वक आभार ---

*** *** ***

अभिप्राय

बाप : नाण्याच्या दोन बाजू :
पुरुषप्रवृत्तीच्या विविध पैलूंचा काव्याविष्कार

आदरणीय प्रा. डॉ. मनोहर झगडू सुरवाडे हे महाराष्ट्रातील एक उत्तम समीक्षक म्हणून साहित्यक्षेत्रात प्रसिद्ध आहेत. सरांच्या नावावर आतापर्यंत चार कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले असून त्यांपेक्षा प्रस्तुत काव्यसंग्रह आगळावेगळा आहे. या काव्यसंग्रहात कवीने बापाची म्हणजेच पुरुषाची चांगली व वाईट अशा दोन्ही बाजू मांडलेल्या आहेत. 'बाप' हा कोणी एक पुरुष नाही. भारतीय समाजात आजही कुटूंबव्यवस्थेला फार महत्त्व आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून 'बाप' ही प्रतिमा कवीने प्रत्येक कवितेत वापरलेली आहे. त्यातून पुरुषकेंद्री जीवनजाणिवा प्रकट करतांना 'बाप' या व्यक्तिरेखेला अनेक भूमिका कशा साकार कराव्या लागतात. प्रत्येकाच्या कृती आणि उक्ती कशा भिन्न असतात. त्याबाबत काव्यात्मक मांडणी इथे केलेली आहे.

मुलांसाठी अहोरात्र कष्ट करून त्यांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहणारा बाप, बापाला कोणीच समजून घेत नसल्याने त्याच्या वाट्याला आलेले एकाकीपण आणि त्या दुःखाची सवय करून घेणारा बाप, मुलांच्या भवितव्यासाठी कष्ट करणारा बाप, घरी आणि घराबाहेर कितीही सांभाळून राहिला, तरी त्याचा अपमान होत असतो, कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी गरिबी, दारिद्र्य, अपमान, लाचारी त्याच्या वाट्याला येते. शारीरिकदृष्ट्या तो मजबूत असला, तरी बौद्धिक, भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर असतो. तसेच मुलांकडून अपेक्षाभंग झालेल्या बापाचे दुःख, पत्नी आणि मुलांच्या बेशिस्त वागण्यामुळे कोलमडून पडलेला बाप, स्थिर आणि संयमी असलेला बाप, इतरांचा विचार न करता स्वतःच्या विश्वात रममाण होणारा बाप, इतरांना स्वतःबद्दल काहीही कळू न देणारा बाप, म्हणजे गुढरम्य

स्वभावाचा बाप, पत्नी आणि मुलांच्या चुकांकडे दुर्लक्ष करून त्यांना समजून घेणारा बाप, स्वतःपेक्षा बायको मुलांच्या व्यथा व त्यांचे दुःख पाहून रडलेला बाप, मुलांचे यश आणि पत्नीचे प्रेमळ वागणे, यामुळे खुश होणारा बाप, अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला बाप, समाजात गोतावळ्याकडून वाईट अनुभव आल्याने समूहापासून दूर जाणारा बाप, म्हणजेच एकाकीपण घालवणारा बाप, प्रेमळ, सहिष्णू आणि माणुसकीबाज बाप, जीवनव्यवहारात अनेक प्रकारचे भावनिक आणि मानसिक वाईट अनुभव आल्याने मौन बाळगणारा बाप, तसेच बायको व मुले कुटुंबकर्त्या पुरुषावर हक्क गाजवतात, समाजाच्या अपेक्षा आणि दबाव, परस्त्री, सोशल मिडीया आणि कायदा यांना बळी गेलेला बाप, सोशल मीडियाचा वापर करत असतांना ऑनलाइनच्या माध्यमातून स्त्रीने पुरुषाची केलेली बेअब्रू आणि त्याला कायद्याचा आधार नसणे, अशाप्रकारे सगळ्याच वाईट परिस्थितीतून अनुभव घेत चांगुलपणाने जगत एखादा पुरुष शेवटी स्टोईक बनतो. तो स्वतःला केंद्र मानून लोकसमूहापासून दूर राहून स्वतःच्या विकासाची वाटचाल करीत असतो. अशा स्टोईक पुरुषाची कहाणीदेखील या काव्यसंग्रहात सांगितलेली आहे. अर्थात पुरुषाच्या ठिकाणी असलेल्या चांगल्या प्रवृत्तीची एक बाजू कवीने या संग्रहात मांडलेली आहे. तसेच व्यक्ती ही पूर्णपणे चांगली नसते. त्याच्यात काही वाईट गुणही असतात; म्हणून डॉ. सुरवाडे यांनी 'बाप' म्हणून पुरुषाची दुसरी बाजूही कवितेच्या रुपाने अधोरेखित केलेली आहे.

पुरुषाचे स्वतःवर नियंत्रण नसल्याने कुटुंबावर अवकळा आलेली दिसून येते. त्याच्या ठिकाणी संशयीवृत्ती दिसते. 'वंशाला दिवा हवा' या अट्टाहासापायी पती त्याच्या पत्नीला समजून घेत नाही. बायको, मुले, मित्र, मंडळी, नातेवाईक, यांच्यासाठी पैसे खर्च न करणाऱ्या पुरुषाची प्रवृत्ती प्रकट होते. व्यसनामुळे कुटुंबाची कशी दाणाफाण होते, याचेही वर्णन केलेले आहे. पुरुष घराबाहेर शांत आणि सज्जन असतो, बाहेरचे ताण घेऊन तो घरी येतो, पत्नीवर चिडचिड करतो. स्त्रीच्या मोहामुळे माणूस रसातळाला जातो. कामचुकारपणामुळे व्यक्तीच्या मनात सतत भीती असते. एखादा पुरुष बौद्धिक, शारीरिक, मानासिक आणि भावनिकदृष्ट्या दरिद्री दिसतो.

स्वार्थासाठी स्वाभिमान गुंडाळून ठेवणारा पुरुषही आहे, माझंच भलं व्हावं, हा संकुचित विचार तो करतो. 'आळस' हा माणसाचा शत्रू आहे, हे माहीत असतांनादेखील माणूस त्याच्या मनासारखा वागतो व त्यातच त्याचा अंत झालेला दिसून येतो. कुटुंबाप्रती आपली जबाबदारी असतांनादेखील आपले काहीच देणे-घेणे नाही, असा पवित्रा हा पुरुष घेतो. समाजात कायदे व नियम असतांनाही तो अनेक प्रकारचे भ्रष्ट आचरण करतो. तो नैतिकतेची थोडीही चाड बाळगत नाही, असा भ्रष्ट बापही कवितेत साकार झालेला आहे. काही पुरुष चंगळवादी संस्कृतीचे प्रतिक असल्याचे दिसून येते. खोटी शान, पार्ट्यां करून तो स्वतःच्या विश्वात रममाण होतांना दिसतो, यातून कर्जबाजारी होतो. नैतिकता खुंटिला टांगून बेछूट वागणारा पुरुषही दिसतो. सत्ता व पैशांची नशा त्याला आहे. शिवाय तो स्त्रीलंपटही दिसून येतो. याचबरोबर कवीने स्वतःच्या अवतीभोवती अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टी व वाईट प्रवृत्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यक्तीचे मानसिक आंधळेपण सांगितले आहे, त्यातून तो मुका, बहिरा आणि बधीर असल्याचे काव्यमय भाव स्पष्ट केलेले आहे.

प्रस्तुत काव्यसंग्रहात हिंदी आणि इंग्रजी शब्द दिसून येतात, जसे- टिव्ही, ऑनलाइन, रिचार्ज, रिस्पॉन्स, क्लास, किचन, डॉक्टर, वार्ड, ऑफिस, वॉर्निंग, ओके, मोबाईल, फाईल, क्रिकेट, मॅच, कॉल, रेस्टॉरंट, मिनीपार्टी, फॅमिली, बॉण्ड्री, कंट्रोल, सोशल मीडिया, पोस्ट, लव लेटर, टाइमपास, सिनेमा, ऑनलाईन क्लास, प्रोटीन, व्हिटॅमिन, कॅल्शियम, नॉनव्हेज, इन्फेक्शन, प्रॅक्टिस, पार्टी, चॅटिंग, मेडिकल, शॉपिंग, ड्रायव्हर, टेन्शन, बीपी, शुगर, चॅप्टर, आईस्क्रीम, व्हाट्सअप, यांसारखे विविध शब्द आलेले आहेत. मात्र आज लोकव्यवहारात इंग्रजी शब्द रुढ होत गेल्याने ती कवीची अभिव्यक्ती किंवा कथनशैली आहे, असे आपण लक्षात घेऊ शकतो. सोबतच विविध म्हणी वाक्प्रचार जसे-'गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा', 'नळी फुंकली सोनारे इकडून तिकडून गेले वारे,' त्याप्रमाणेच प्रतिमा-प्रतीकेदेखील काव्यात जागोजागी आलेली आहेत. हिंदी गाण्यांच्या काही ओळी आवश्यक त्या ठिकाणी काव्यात आलेल्या आहेत. त्यामुळे काव्याचा आशय अधिक गडद होत जातो. जसे-" मतलबी है लोग यहा पे, मतलबी जमाना, सोचा साया साथ दे गा,

निकला ओ बेगाना" किंवा 'हम ना समजे थे, बात इतनी सी, आप शीशे के दुनिया पत्थर की' असे हे सिनेगीत कवीच्या भावाविष्काराला प्रवाही बनवतात.

डॉ. मनोहर सुरवाडे यांची काव्याभिव्यक्ती ही लक्षवेधी तर आहे; पण त्यात नावीन्यपूर्ण विषय आणि आशयाची मांडणी करतांना त्यांनी केलेल्या रचनेत वाचकांना एकाच वेळी काव्याची लय आणि त्यातील तालबद्धतेचा अनुभव घेता येतो. तसेच त्यातील घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्या चित्रणांमुळे या कवितांना कथेचा घाटही प्राप्त झालेला दिसतो; म्हणूनच मराठी साहित्यात विषयाच्या नवीनतेबरोबर अभिव्यक्तीचे वेगळेपणही कवीने राखलेले आहे. रसिक-वाचक त्याचा आस्वाद घेतील व वेगळ्या अनुभूतीने मनोमन आनंदित होतील, यात शंकाच नाही.

*** *** ***

डॉ. स्वाती काशिनाथ महाजन

मराठी विभाग

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर

जि. जळगाव -४२५५०३ / मोब. ९५०३८६७१००

अर्पण

फक्त कष्ट करीत राहिला, सगळ्या जगापासून दूर असलेला बाप

शेती आणि घर सांभाळत एकाकी आयुष्य जगलेला बाप

एकदम साधाभोळा, निरक्षर, घाबरट बाप

पण मुलांच्या काळजीने चिंतेत असलेला बाप

मुलांच्याप्रती जबाबदारी व कर्तव्य पार पाडून

दीर्घ आयुष्य जगलेला बाप

त्याचं नाव झगडू

पण कधी कोणाशी न झगडलेल्या या बापास विनम्र अभिवादन -----

अनुक्रमणिका

१. बाप

२. उपेक्षित बाप

३. स्वप्नाळू बाप

४. कर्जबाजारी बाप

५. अपमानित बाप

६. लाचार बाप

७. कमजोर बाप

८. भंगलेला बाप

९ . कोलमडलेला बाप

१०. सावरलेला बाप

११. बदलणारा बाप

१२. रहस्यमय बाप

१३. समजून घेणारा बाप

१४. रडलेला बाप

१५. हसलेला बाप

१६. आंधळा बाप

१७. संयमी बाप

१८. बाप : सच्चा दोस्त

१९. थकलेला बाप

२०. बापाचा बळी

२१. बेइज्जत बाप?

२२. स्टोइक बाप

२३. युनिकबाप

२४ - बाहेरख्याली बाप

२५ - संशयी बाप

२६ - नाराज बाप

२७ - कंजूस बाप

२८ - व्यसनी बाप

२९ - चिडखोर बाप

३० - देहासक्त बाप

३१ - भित्रा बाप

३२ - दरिद्री बाप

३३ - स्वार्थी बाप

३४ - आळशी बाप

३५ - बेफिकीर बाप

३६ - भ्रष्ट बाप

३७ - उधळ्या बाप

३८ - वासनांध बाप

३९ - आंधळा बाप

४० - बहिरा-मुका बाप

४१ - खुदपसंत बाप

४२ – कामुक बाप

१. बाप

बाप बोलत नसतो, फक्त राबत असतो
बाप मुकाच असतो, मुलांच्या स्थिर नजरेत
त्यांचे भविष्य वाचतो, डोळ्यात स्वप्न घेऊन झोपतो

बाप बोलत नसतो, बैलासारखा चालत राहतो
मुलांच्या सुखी प्रवासासाठी दुडुदुडू स्पीड घेतो
बाप मुलांची वाट मोकळी करण्यासाठी
रस्त्यावरचे दगडं बाजूला सारतो

चालता चालता बाप ठेचकाळतो
आणि- बऱ्याचदा रक्तबंबाळ होतो
तरी तो कधीच रडत नसतो, धावतच असतो
मुलांचे अश्रू पुसण्याचे शर्तीचे प्रयत्न करतो

बाप कधीच हसत नसतो, फक्त कष्टच करतो
कारण, मुलांना हसवण्याचे तो बेत आखतो
आभाळभर स्वप्नांच्या गडगडाटामध्ये
बाप स्वतःला विसरून जातो

बाप न बोलता, राबता-राबता, सटकलाच तर
मुलांवर खूप रागावतो, चिडतो, मारतो
तरीही त्याच्या अंतर्मनाच्या नदीतून
नितळ पाण्याचा प्रवाह खळखळ वाहतो

*** *** ***

२. उपेक्षित बाप

बाप घरात येतो, सारे उंदरासारखे गप्प बसतात
आणि कोणीच कोणाशी बोलत नसतात
बाप नावाचा माणूस, तेव्हा त्यांना बोका वाटतो
समजून घ्यायला फार कठीण दिसतो

थकून आलेल्या बापाचा चेहरा
कोणीच का वाचत नसतो?
आई कामात आणि मुलं खेळण्यात
जो तो ज्याच्या त्याच्या विश्वात रमतो
आणि बापापासून दूर जात असतो

अनेक कामं करतांना ठोकरा लागून
रक्तबंबाळ झालेल्या अंगठ्याकडे पाहून
बाप एकटाच एका कोपऱ्यात बसून
कुणालाही न सांगता, का राहतो गुमसुम ?
फारसा कोणी विचार करत नाही, सारेच असतात सामसूम

कोणीच का त्याला, समजून घेत नसतो
त्याचे दुःख तो एकटाच का कुरवाळतो
आईलाही तो का सांगत नसतो
फक्त जेवण वाढण्याची वाट पाहतो
सगळे त्याच्यावर प्रेम करतात, तरी तो अबोल का राहतो ?

दुःखाची सवय करून घेतलेला बाप
लोकांच्या मनाचे घेत असतो माप
रक्ताळलेल्या पायाला बऱ्याचदा
चिंध्या बांधून चालतो झप-झप
हातात संसाराची माळ घेऊन करतो जप-तप

बाप जसा खुंट्यावर बांधलेला बैल
चारा-पाण्यापुरताच असतो सैल
आई त्याला पोळ्यालाच सजवते
बारोमांस नांगराला जुपते, गोठ्यात बांधते
इकडे-तिकडे जाऊ नये त्याने, संसाराशिवाय पाहू नये त्याने
जबाबदारी समजते, लोकांनीच तिला, तसे शिकवलेले असते

*** *** ***

३. स्वप्नाळू बाप

बापाला काळजी आणि चिंता
म्हणजे दोन बाजूचं एकच नाणं
तो झोपतांना नजरेत भरून घेतो
डोळ्यात झोप नसते, सुखी संसाराचे स्वप्न पाहतो

सकाळी उठून गुंगलेलाच असतो
बापाच्यासमोर संकटांचा मोठा डोंगर दिसतो
खाच-खळगे, दगड-धोंडे पाहून
बाप मनाने जरा कच खातो, तरी ---

हिमतीने चढ चढून जाण्याचा
निर्धार पक्का करतो आणि अथकपणे चालत राहातो
मुलांना चलनी नाणं बनवण्यासाठी
बाजारपेठेत त्यांची मागणी वाढण्यासाठी

मनात इच्छा भरून, पायात बळ आणून
हातावर मुलांचे भविष्य कोरून
बाप चालत राहतो नेटाने, अगदी ताकत लावून
पडझड झाली तरी, मुलांसाठी सारं आणतो ओढून

*** *** ***

४. कर्जबाजारी बाप

सकाळी चहा देता देता, आई म्हणाली,
अशी वेड्यासारखी, मान खाली का घातली
दसरा असाच गेला, दिवाळी तोंडावर आली
कर्ज नाही तं, उसनवारी करा, आई ओरडली

पाहतो म्हणून, बापानं मान वर केली
लकवा झाल्यासारखी, त्याची वाचा गेली
त्याच्या हातातील चहा, फरशीवर सांडला
घशात नाही गेला, उरला तेवढ्यात किडा पडला

काही बोलणं नको, म्हणून बाप उठला
तोंडात मारल्यागत, विचार करत बाहेर गेला
मनात काही जुगाड केला, पायात बूट घातला
रस्त्याला लागतांना, फार गोंधळून गेला

कोणत्या दिशेने, कुठे टाकावे पाऊल
कोण देईल साथ, होईल उदार कर्ण
पगार सगळा हप्त्यात, नुसते नावाला वेतन
जहर खायला एक पैसा नाही, महाग झाले मरण

*** *** ***

५. अपमानित बाप

बाप सकाळी लवकर उठतो
त्याचा तोच, चहा करून पितो
जमलेच तर कधी-कधी आईसाठी
त्यात एक कप पाणी वाढवतो

गाडी काढतो, मुलांना शाळेत सोडतो
पोहचायला उशीर झाला म्हणून
गुरुजी, बापाला वॉर्निंग देतो
बाप खाली मान घालून ऐकून घेतो

बाप घरी येऊन घाईघाईनेच तयारी करतो
ऑफिसला जातो, डबा झालेला नसतो
आजच्या दिवस, बाहेर नास्ता करून घ्याल
आईच्या बोलण्याला, मूक संमती देतो

आज माझा उपवास आहे
येतांना भाजीपाला आणाल
बिचारा बाप घेतो ऐकून
ओके म्हणून, जातो खाली मान घालून

घाईगडबड करूनही बाप उशीरा पोहोचतो
नेहमीचच म्हणून साहेब रागावतो
बाप, खाली मान घालून
त्याच्या कामाला लागतो

टेबलावरच्या फायली उगीच चाळतो
कागदावरच्या अक्षरांचे अर्थ लावतो
डोकं बधिर होत जातं... आणि
त्याला सारं बकवास वाटतं

मन थिजल्यासारखं झालं, म्हणून
सहकाऱ्यासोबत, कॅन्टीनला जातो
चहा पिता-पिता, बापाच्या मनात
मुलांच्या शिक्षण फी'चा, विचार येतो

विषय काढावा कसा, म्हणून गोंधळतो
त्याच्या डोक्याला ताण येतो
पाचेक हजार, देशील का यार
बाप कसा तरी, हळूच विचारतो

काय रे, नेहमीच तुझं भिकारपण
सहकाऱ्याचं हे बोलणं, बापाचं अपमानित जगणं
त्याला आठवतं स्मशान, ऐकून घेतो नाईलाजानं
*** *** ***

६. लाचार बाप

आईने दिलेली सामानाची यादी
भली मोठी असल्याचे पाहून गोंधळतो
मुकाट्याने हातात पिशवी घेऊन
बाप विचारांच्या तंद्रीत घराबाहेर पडतो

मागचीच उधारी बाकी
मनात त्याच्या एकच भीती
दुकानदार, देईल का सामान?
का करेल, आताही अपमान ?

डोक्यात प्रश्न, खावे लागते अन्न
जगण्यावर संताप, कोणत्या जन्माचे पाप
झाडपाला खाऊन, जगता आले असते, तर
हात पसरवले नसते, पगार शिलगावले असते

पाऊल टाकत गेला एकेक
बापाच्या डोक्यात विचार अनेक
रस्ता संपता, संपतच नव्हता
नको ते लाचार जगणे, मनात म्हणत होता

समोरच्या दुकानदाराला पाहून
इच्छा नसतांना हात जोडून
बापाने केविलवाणे नमस्कार केला
हळूच एकेक पायरी चढला
समोर किराणा यादी ठेवून म्हणाला,
सेठ, हे घ्या -----

आधी मागची बाकी द्या
मग कितीही सामान घेऊन जा
दुकानदार म्हणाला, बापाचा चेहरा उतरला
इवलंसं तोंड करून, बाप हळूच बोलला
पगार झाला की, नक्कीच मागचं पुढचं सगळं देतो
बाप जिभेला लाचार वळण देत म्हणाला

दुकानदार फार हुशार, गोड बोलतो यार
पण, अर्धेच सामान मोजतो
पगार झाले की, या म्हणतो
बाप तसाच कुढत घरी येतो
आईच्या भीतीनेही, तो मुकाच असतो

*** *** ***

७. कमजोर बाप

बाप, लांबी-रुंदीनं आडदांड
दिसतो जसा सांड, पण डोक्याला ताण
त्याची देहयष्टी न्यारी, चाल एकदम भारी
बापाच्या भेज्यात आणि दम नसतो कशात

एक सांगावं, तर दुसरंच करतो
इतरांच्या नावानं उलट्या बोंबा मारतो
थोडंसं दुखलं की कण्हत बसतो
माझ्याकडे लक्षच देता नाही म्हणतो

हळवा बाप, मोठा भावुक होतो
सगळ्यांची सहानुभूती मिळवतो
खाल्लं की, नुसता झोपून राहतो
आणि तब्बेतीकडे दुर्लक्ष करतो

बापाला कितीही सांगितले तरी
सोनाराच्या नळीसारखा असतो
इकडून तिकडे जातात वारे
तरीही बाप म्हणतो, माझेच खरे

विचारांच्या दुष्काळात, बापाची बुद्धी करपते
व्यवहाराच्या शेतीत, भावनेचे गवत उगवते
आई निंदण करते, तरी कुपोषणाला बळी पडते

कोणाशीही बोलतो, उगीच बडबड करतो
हो ला हो लावतो आणि दुर्बल ठरतो
बाप, चिकन गुनिया झाल्यासारखा
शरीर दुखवतो, प्रेमाची औषधी मागतो

प्रेम आणि जिव्हाळा बाजारात मिळत नसतो
पैसे असूनही बाप उपेक्षित राहतो
दुनियेची रीत ओळखत नसतो
अपेक्षा बाळगतो आणि कमजोर बनतो

*** *** ***

८. भंगलेला बाप

सूर्य बुडाला, अंधार पडला
बाप टीव्ही पाहण्यात रंगला
आईने स्वयंपाक केला, तरी
मुलगा घरी नाही आला

बाप जेवला, टीव्हीवर सिनेमा पाहिला
दहा वाजता झोपून गेला, तरी
मुलगा घरी नाही आला
बापाचा जीव खाली-वर झाला
डोळा लागला नाही डोळ्याला

बाप सकाळी उशिराच उठला
ऑफिसला जायला निघाला, तेव्हा
मुलगा झोपलेला दिसला,
बाप आईला म्हणाला...
रात्री तो, केव्हा आला ?

आईने कान पाडून, मूग गिळून
बापाच्या हातात डबा दिला

बाप घराबाहेर पडला, पण तुटला
मुलाच्या नोकरीचा किडा
बापाच्या डोक्यात वळवळला

बाप ऑफिसमधल्या खुर्चीवर बसलेला
जसा पुतळा आणून ठेवलेला
सवारी काय टेन्शनमध्ये दिसते
रात्र चांगली गेली नाही वाटते ?
सहकारी म्हणाला, बाप भानावर आला
त्याच्याकडे पाहून हलकेच हसला
पण, बाप मुडलेला वाटला

बापाने टेबलावरच्या फाईलला हात लावला
मुलगा डोळ्यासमोर आला, पण, मनाला तडा गेला
मुलाचे कसे होईल, विचारातच चाळली फाईल
मन ठिकाणावर नव्हते, सगळे दगडं वाटत होते

राग नको मानू, एक सांगतो तुला
रात्री तुझा मुलगा ढाब्यावर दिसला
मित्राबरोबर पार्टीत रंगला, दारू पिला
बाप भानावर आला, ते ऐकून काचेसारखा फुटला

हम ना समझे थे, बात इतनी सी
आप शिसे के दुनिया पत्थर की
रात्रीच्या सिनेमातील गाणं आठवत गेला
किती करावी धडपड, होत राहते पडझड

आले वर्षे असेच गेले, हात रिकामेच राहिले
शिक्षणाचा खर्च, क्लासची फी, नाही झेपावलं
जुळवा-जुळव करतांना नाकीनऊ आलं
मुलाचा निकाल पाहिला, तर अर्धेच विषय निघालेला

बापाच्या डोळ्यात पाणी आलं
कोणालाच कधी नाही दिसलं
आईनेच पोट्ट्याले लाडवून ठेवलं
बापाचं अंतःकरण जळलं, मन दुभंगलं

*** *** ***

९ कोलमडलेला बाप

हॉलमध्ये चौघे बसलेले
जसे, मोबाईलच्या स्पर्धेत गुंतलेले
शेजारी असूनही, वेगवेगळ्या दिशेला
तोंड करून बसलेले, जसे कोसो दूर असलेले

तिघांच्या हातात मोबाईल फोन
बाप विचारतो, पाणी आणेल कोण
कुत्र्यांनी जसे कान पाडले
हातातली फाईल ठेवून, बापाने पाणी घेतले

मोबाईलची रिंग वाजली, मुलगी गच्चीवर गेली
मग आईही उठली, भांडे घासत बसली
मुलाने टीव्हीवर क्रिकेटची मॅच पाहिली
मुलीने स्कुटी काढली, म्हणे क्लासला चालली

संध्याकाळ झाली, अंधार पडला
तरी मुलीचा पत्ता, नाही लागला
फोन कर तिला, बाप रागावला
फोन केला, तर आवाज आला
जीस नंबर को आप
संपर्क करना चाहते हैं,

ओ अभी बंद हैं
आपण ज्या नंबरला कॉल करीत आहात
तो नेटवर्क कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर आहे
कृपया नंतर कॉल करा, बापाला वाटलं मरा

बापाचा पारा चढला, पण आतून ढासळला
गाडी घेऊन घराबाहेर पडला
ओळखीच्या माणसांना चुकवत
मुलीच्या शोधात, दिशाहीन फिरला

बाप नेहमीच्या रेस्ट्रॉरंटमध्ये गेला
काय घेता साहेब, वेटर म्हणाला
दीदी आत्ताच मित्रमंडळीसोबत
मिनीपार्टी करून गेली, फॅमिली नाही आली
बाप उसणं आणून हसला, पण आतून रडला
लफड्याच्या वादळात, झाडासारखा कोसळला

बाप तिकडूनच बारमध्ये गेला, फुल्ल होऊन घरी आला
त्याच्या कोलमडण्याचा अर्थ, कळला नाही कोणाला
ज्याच्या त्याच्या तालात, एकाच घरात, जो तो आपापला
बाप कोलमडून पडला, पण कोणाला नाही दिसला
*** *** ***

१०. सावरलेला बाप

बापाच्या ध्यानात आलं
जग भावनेच्या पायावर
न्यायाच्या कॉलमवर
चालत नसतं म्हणे कधी
सरळ व्यवहार पाहावे आधी

सगळ्यांचेच मनं राखता-राखता
बाप एकदम भानावर आला
आणि स्वतःलाच दुर्बल मानू लागला
त्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला

ज्याचे-त्याचे एक स्वतंत्र विश्व आहे
आपण उगीच का, त्यात नाक खूपसायचं
सगळ्यांना सोडून द्यायचं आणि स्वतःकडे पाहायचं
दुसऱ्याच्या विचारात, का बुडून जायचं

आतले आणि बाहेरचे, कोणीही असो
आपणच आपली बॉण्ड्री, सेट करायला हवी
आतल्या आवाजाला साथ द्यावी, स्थिर भूमिका घ्यावी
चलाख दुनियेत धोकेबाज रिलेशन, नाही कोणाचे कोण

सगळ्यांना खुश करण्याच्या नादात
प्रेमाने धडपडणारा भावनाशील बाप
उगीच करून घेतो, डोक्याला ताप
अखेर एका वळणावर शांत झाला
आणि भावनांवर नियंत्रण ठेवू लागला

*** *** ***

११. बदलणारा बाप

कंट्रोल आणि सायलेंटचे अर्थ शोधता-शोधता
बाप बुचकळ्यात पडला, शब्दकोश पाहता पाहता
आपण आपले म्हणून, व्यक्तीला जवळ करतो
आणि जो तो आपल्याला, कंट्रोल करू पाहतो
बाप मनाला प्रश्न करतो आणि विचारात पडतो

बापात संचारले होते माणुसकीचे भूत
लोकांचा मोह आणि त्यांच्या मान्यतेची भूक
चांगला तेवढा वाकवला, ठोकरा लागल्या खूप
त्याला कळून चुकले, परोपकार हीच आपली चूक
बापाने स्वतःला चांगलं सिद्ध करणे सोडले
मतलबी दुनियेला दोन्ही हात जोडले

शेवटी लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा नाद सोडला
स्वतःलाच केंद्र बनवत गेला, आत्मस्तुतीचा किडा मारला
जीवनाचे ध्येय ठरवीत गेला, त्याच्या मिशनमध्ये गुंतून राहिला
एकटेपणात माइंड रिप्रोग्राम केला, एनर्जी राखून ठेवू लागला

बाप आरशात पाहून, स्वतःला ओळखत गेला
नियंत्रित संचार करून, अनिश्चित राहिला

उद्देशपूर्ण जगण्यासाठी, गर्दीतून गायब झाला
बाप बदलला आणि मौन धारण करून बसला

लोकांकडून अपेक्षा केल्याने आतून तुटलेपण आले
कोणाला नाही कळले, बापाने स्वतःच्या मनाला बजावले
आतून आवाज आले, तुझासाठी इथे काहीच नाही राहिले
नैराश्य दूर केले, हरवले ते गवसले, जसे सोने सापडले

आत्मविश्वासाने भावनांना मर्यादा घालावी
सूर्य होऊन धुक्यातील वाट मोकळी करावी
बेचैनी गाडून टाकावी, सुखाची चव घ्यावी
बाप म्हणाला स्वतःला आणि आनंदीत झाला

बापाच्या डोक्यात एक आयडिया आली
स्वार्थाचा निर्णय घेतल्याने जगण्याला दिशा मिळली
बदलण्यात असतो विकास, वाटतो एकदम झकास
आपल्या जीवनाचे आपणच शिल्पकार, मानायची नाही हार
बापाने मायाजाल फेकून दिले, पहिले स्वतःचे हित पाहिले

फालतू नाद सोडून दिला, छोटा छोटा प्रोजेक्ट केला
गुंगलेला कोंबडा ठणठणीत झाला, सोन्याचा दिवस उगवला
राजा बोले दल हाले, बाप त्याच्याच तालात चाले
स्वतःची व्हॅल्यू स्वतःच समजला, आय लव्ह माय सेल्फ म्हणू लागला

*** *** ***

१२. रहस्यमय बाप

बाप विचारात पडला, एका जागी बसला
नको कोणाला बदलवणे, स्वतःच बदलत जाणे
इथे उपदेशाची होते माती, दगड म्हणून फेकतात मोती
डोंगर पोखरून उंदीर लागतो हाती, तुटत जातात नाती

नको दया, नको न्याय, खरी असते माय
म्हणून बापाने अतिरिक्त भावनांची होळी केली
लोकांमागे पळण्यापेक्षा दोन पावलं माघार घेतली
मेडीटेशन शिकून घेतलं, त्याचं मन शांत केलं

बोंबलून बोंबलून थकलेल्या बापाला साक्षात्कार झाला
व्यक्तीच्या स्वभावाचा आणि परिस्थितीचा स्वीकार केला
फुकटच्या शब्दांना किंमत नसते, म्हणून हळूहळू दूर गेला
प्रतिक्रिया देण्यापेक्षा स्वतःला दिशा देत राहिला

स्वतःचे निर्णय, विचार आणि कार्य
नाही चिंता, नाही बेचैनी, बाळगले धैर्य
पोस्ट बंद पडले, लवलेटर गायब झाले
सोशल मिडीयाने अनियंत्रित केले
बापाला कळले, मोबाइल बाजूला ठेवले

वेळ आणि ऊर्जा, खर्च करू नये फुकट
ऊस गोड लागला, अनेकांनी खाल्ला मुळासकट
बाप मनाशीच बोलला, एकाकी होत गेला
आई आणि मुलांना, तो भलताच गूढ वाटला

कोणाचीच फिकीर न करता, बापाने मोकळा श्वास घेतला
घरचे झाले थोडे, व्याह्याने धाडले घोडे
तिकडे दुर्लक्ष करून बाप पुढे-पुढे चालत राहिला
त्याचा चेहरा वाचला, स्वजणांचा जीव गुदमरला
हलक्यात घेतल्याचा पश्चाताप झाला, पण इलाज नाही त्याला

कामाची माणसं आणि साधनं हवेत जपायला
शिकवले नाही कोणाला, डिग्री घेऊन फायदा नाही झाला
पुन्हा पुन्हा सांगून, बाप ज्यांच्यामागे लागला
ते कान पाडून, दूर पळत गेले, म्हणून
बापाने भावना थिजवल्या आणि मनही गोठवले
जसे हिमालयात साधू तपस्येला बसले

पिंजऱ्यात होता तोपर्यंत खेळवले, लोकांचे डाव लक्षात आले
बापाला मुक्त होण्याची जाणीव झाली, कडी काढून भरारी घेतली
पिंजऱ्यातील पोपट उडाला, बंधनातून मुक्त झाला
दुरून डोंगर साजरे, बापाला म्हणीचे अर्थ कळले
दुर्मिळ झालेल्या बापाकडे, सगळ्यांचे लक्ष वेधले गेले

*** *** ***

१३. समजून घेणारा बाप

टीव्ही अचानक बंद पडली
बायको मुलांची स्पर्धा संपली
पोरगं अभ्यासाला लागलं
बापाला तेव्हा बरं वाटलं

मुलाने पुस्तक ठेवून दिलं
बापाला, रिचार्ज करायला सांगितलं
बापाने झटक्यात रिस्पॉन्स दिला
पण, ऑनलाईन क्लास सोडून
पोरगा टाईमपास करत राहिला
आणि बापाला, जसा कोरोना झाला

बापाने आईचा हुकूम पाळून
टीव्ही दुरुस्त करून आणला
मुलीला फार आनंद झाला
तिने किचन सोडून दिलं
आणि मालिकेचा एपिसोड पाहिला

मुलं केव्हा अभ्यासाला लागतील
याची वाट पाहून, बाप फार थकला

डुलक्या देऊ लागला, शेवटी झोपून गेला
कुसा बदलत बेचैन झाला, आईने तो नाही पाहिला

आले दिवस, गेले दिवस
बाप फक्त पाहत राहिला
रात्री पोरगा फुल्ल होऊन आला
डोलतडालत सोफ्यावर बसला

इतकी नसती घ्यायची रे, जा झोप आता
बाप काळीज हातात घेऊन बोलला
नाही पप्पा, माझा ब्रेकअप झाला
मुलगा म्हणाला, बापाने समजून घेतला

काय वेड्या, कमजोर आहे गड्या
तिच्यापेक्षा चांगलीच मिळेल
कदाचित तेच नशिबात असेल
मीच तिला शोधून आणेल, बापाने धीर दिला

जे घडतं ते भल्यासाठीच असतं
बाप म्हणाला, असं खचून जायचं नसतं
मुलाच्या पाठीवर हात फिरवला
तो मनाने हलका झाला आणि थँक्यु म्हणाला

बाप पोरीला म्हणाला,
बेटा तुझाही कोणी, असेलच मित्र
तर बनवू नको त्याला कुत्रं
त्याच्या आईवडिलांना घेऊन
घे त्याला बोलावून, टाकू लग्न उरकून

तिघांना बापाचं नवलच वाटलं
हळूच मग, बापाने आईला विचारलं
तुझ्याही मनात असेल काही, तर
मोकळं सांग, सारं खुंटीला टांग

सारेच चिडीचूप बसले- आणि
बापाने मोकळे श्वास घेतले
अंधारात किडे, ओरडत राहिले
बापाने, निवांत डोळे मिटले

जे घडतं ते आपल्या हाती नसतं
समजून घ्यावं लागतं, मग चांगलं चालतं
एक दिवस सरणावर नक्कीच जावं लागतं
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर बदलायचं असतं
ताणाचं ओझं घ्यायचं नसतं, असं बापाच्या लक्षात येतं

*** *** ***

१४. रडलेला बाप

आई सांगत होती कधीमधी
बापाच्या मोठमोठ्या गोष्टी
म्हणे, तुझ्या जन्माच्या वेळी
अचानक पोट दुखलं... आणि
निम्म्या रात्री तुझ्या बापानं
कसं तरी दवाखान्यात नेलं...
मुलाला काही, विशेष नाही वाटलं

तो फक्त शांत राहिला... आणि
आईने पुढचा किस्सा सांगितला
दुसऱ्या दिवशी पुन्हा तसंच झालं
तुझ्या बापानं दवाखान्यात नेलं

संध्याकाळच्या वेळी बेटा
दवाखाना होता सामसूम
आम्ही दोघंच बसलो गुमसुम
डॉक्टर म्हणाले, मत डरो तुम

मग काय झालं, मुलाने विचारलं
वार्डात भरती केलं, आईनं सांगितलं
पुढे काय झालं, काही नाही कळलं
पण, शेजारच्या बायांनी सांगितलं

बाई, तू अडली तेव्हा
तुझ्या घरचा माणूस रडत होता
आम्हीच सांगलं होतं त्याला
भाऊ, इतका रडतो कशाला
काळजी आहे त्या भगवंताला

डॉक्टर म्हणाले, सीझर करावं लागेल
तुझा बाप घाबरला आणि लागला रडायला
बायांनी तेही सांगितलं, म्हणे तेव्हाही रडला
पण, स्वतःचा पाय मुडला, तेव्हा
तुझा बाप, का नाही रडला?
अजूनही प्रश्न पडतो मनाला

एकदा गेटमधून गाडी आत घेतांना
तोल गेला आणि तुझा बाप खाली पडला
मी हात धरला, तर त्यांनी पाय नाही उचलला
तेव्हा तर काही नाही रडला, फक्त विव्हळला

मुलांचा बाप असाच असतो, कुटुंबासाठी दुःख विकत घेतो
आयुष्यभर ओझे वाहतो, आपल्याला काही झाले की रडतो
मुलांच्या अपयशाने, त्यांच्या करिअरच्या काळजीने
बाप आसू गाळतो, पण कोणाला दाखवत नसतो
स्वतःसाठी रडत नसतो, दुःखाची कळ सहन करतो
साऱ्या वेदना गिळतो, कुटुंबाला सुखी ठेवतो

त्याला पहिल्यापासून सांगितले जाते, भागूबाईसारखे रडायचे नसते
वेदना सहन करून, मजबूत दिसायचे असते, त्यालाच पुरुषार्थ मानले जाते
माणूस खचला की त्याची किंमत कमी होते, म्हणून व्यथा सांगायची नसते
बापाची घडण अशीच झालेली असते, दुख पचवून सुख वाटावे लागते

*** *** ***

१५. हसलेला बाप

सूर्य बुडाल्यावर बाप घरी आला
एक पाय दारात आणि एक घरात
तेवढ्यात आईने विचारले, एवढा उशीर का झाला
बाप थोडा थांबला आणि तिच्याकडे पाहून हसला
आईला त्याचा अर्थ नाही कळला, मग बाप म्हणाला

तुझी सवत भेटली आणि गळ्यातच पडली
येऊच देत नव्हती, हात माझा धरला
विनंती करून म्हटलं तिला, जाऊ दे मला
ताप डोक्याला, उत्तर द्यावे लागेल बायकोला

स्वतःच्या जोकवर स्वतः हसून आईला चिडवले
खरे वाटून तिने डोळे ताणले, बापाचे बारा वाजले
मग सकाळीच आले असते, आईने म्हटले
नाकावर तिच्या रागाचे शिंतोडे दिसले
बापाने स्मित करून आईच्या हातात गिफ्ट दिले
तिच्या मनात लड्डू फुटले, डोळे मोहक केले

बापाला प्रमोशन मिळाले, म्हणून पेढे आणले

आनंदी बापाच्या डोळ्यात, फार प्रेम दाटले
आईला सरप्राइज देतांना बारीक हसले
बाहेर जेवायला नेले, बील देतांना खुश वाटले

आईने छान जादू केली, बापाची रात्र चांगली गेली
बापाला सकाळ प्रसन्न वाटली, बारीक हसून ऑफिसची वाट धरली
संध्याकाळी थकून आल्यावरही, बापाने हसून, आईची कामं केली
जोडी त्यांची लाख मोलाची वाटली, त्रासाची गोष्टही हसण्यावर नेली

मुलांच्या वाढ दिवसाला केक कापतांना
आईला साडी गिफ्ट देतांना, बापाच्या चेहऱ्यावर हसू दिसले
बापाने मुलांचे यश पाहून, आनंदात गाणे गुणगुणले
मुलीला मनासारखे स्थळ मिळाले, हसून देवाला हात जोडले

मित्राच्या वाढ दिवसाला, बाप सहकुटूंब गेला
केक भरवतांना गालाला लावला, त्याचा तोच हसला
मित्रानेही केक घेतला आणी बापाच्या तोंडाला चोपडला
फिट्टम-फाट झाले, सगळेच हसले, बापालाही हसू आले

चारचौघात बापाची स्तुती, बापाने हसून केली मस्ती
नावे ठेवले कोणी कोणाला, तर बाप खळखळून हसला

हसायला पैसे लागत नसतात, दात मात्र पिवळे दिसतात
कोण सांगेल कोणाला, बाप हसतो तरी कशाला

आनंदाचे क्षण वेचतांना बापाचे हाल झाले
तरी त्याने हसत-हसत दुःख तोलून धरले
बायको-मुलांच्या चेहऱ्यावर, सुखाच्या कळ्या उमलतांना पाहिले
बापाने मनातल्या मनात हसून घेतले, पण कोणालाच दिसू नाही दिले

*** *** ***

१६. आंधळा बाप

उपासतापास सण-तिथी-वार
बापाची कर्म-कहाणी, काय सांगावी यार
बाप मोठा देवभक्त, श्रद्धेचा पालनहार
सोवळेओवळे करतो आणि कुपोषित राहतो

डॉक्टर म्हणे, नॉनव्हेज चांगला स्रोत
घ्या की प्रोटीन, व्हिटॅमिन, कॅल्शियम
खा म्हटलं, तर त्याला दिसतात यम
व्हेजीटेबलवर नुसता भर, देवदेव करतो घरभर

मांसाहारी माणसाला आजार नसतो
असं काही नसतं की तो अमर असतो
एवढं खरं की, चांगले व्हावे शरीराचे पोषण
मग मिळत नाही रोगाला आमंत्रण
पण, बापाने हवेत उडवलं डॉक्टरचं म्हणणं

गृहप्रवेश करतांना कोणाची नजर लागू नये
म्हणून बापाने दाराच्या चौकटला
लिंबाला सात मिरच्या बांधून लावल्या

तरीही व्हायरल इन्फेक्शनच्या गोळ्या घेतल्या

बापाने नवी-कोरी कार घेतली, खुशीत ड्रायव्हिंग केली
काही अशुभ घडू नये, गाडीला नजर लागू नये म्हणून
येतांनाच आतल्या मिररला, काळी भानामती लटकवली
काय झालं कुणास ठाऊक, गाडी रस्त्यातच पंचर झाली
बापाची बुद्धी गोठून गेली, त्याने तर हायच खाल्ली

बापाला भटजीने सांगितले, शनीचा दोष आहे म्हटले
बापाचे काळीजच धडधडले, त्याला काहीच नाही सुचले
शनिवारच्या दिवशी भटजीने, महाकालीची पूजा करायचे ठरविले
बापाने नंदी बैलासारखी मान हलवली, शनिवार उगवण्याची वाट पाहिली

सगळे कामधंदे सोडून, बापाने पूजाविधीचे सामान आणले
बापाला कळणार नाही, असे भटजीने स्तोत्र म्हटले
पूजा झाली, मनाला बरे वाटले, पण येतांना गाडीवरून पडला
बाप नको त्या नादी लागला आणि पाय मोडून बसला

बाप फार शिकला, पण तितकाच हुकला
देव-धर्म करून, विज्ञानाला मुकला, स्वतःचा सत्यानाश केला
आंधळा बनून, त्याच्याच तालात राहिला

डोळयांना नेनिवेचा चष्मा लागला, खड्ड्यात जाऊन पडला

जागृतीचा अभाव आणि डॉक्टरचे वाढविले भाव
विचारांच्या सवयीचा गुलाम, दुनियेला करी सलाम
एकदा बीपी वाढला आणि बापाला लकवा झाला
चौकटीच्या बाहेर नाही पडला, तोच वारसा मुलांना दिला

बाप सर्दी खोकल्याने आजारी पडला
सकाळी पूजाविधी करून दवाखान्यात गेला
त्याच वेळी कोरोनाने धुडघूस घातला
इम्युनिटी पावर कमी, म्हणून बाप भरती झाला
कोरोना बाधित म्हणून, नको ते उपचार केले
आठव्या दिवशी प्राण गेले, त्याला तिकडेच जाळले
त्याचे तोंडही नाही दिसले, सगळे रडले आणि बोंबलले

*** *** ***

१७. संयमी बाप

आप्तजणांच्या मागे लागून, सांगून-सवरून थकलेला बाप
दगडाची मूर्ती बनला, फुकटचा उपदेश फेकून दिला
हाताला घडी, तोंडावर बोट ठेवून,तपस्वीसारखा डोळे मिटून राहिला
कोणी काल मरो आज, आपण करावा आपला साज

बापाने ठरविले, बुडणाऱ्याकडे दुर्लक्ष केले
मनातल्या इच्छा-लालसा, बरंच काही जाळत गेला
एकेक इंच मागे सरकला, शांत आणि स्थिर झाला
बापाचा आत्मा थंड होत गेला, जो तो कोड्यात पडला

बापाच्या ध्यानात आलं होतं, पकडायला जावं, तर दूर पळतं
धरून ठेवलं की, वाळूसारखं हातातून सटकतं
दोरी पकडली की हात सोलते, सोडली की महत्त्व कळते
इथे कोणी कोणाचे नसते, आपले आपणच व्हावे लागते

नको कोणावर नियंत्रण, बरं आपलं आपण
समर्थन व प्रतिक्रियेनं पांगलं, तोंडाला कुलूपच चांगलं
उशिरा का होईना, बापानं ठरवून टाकलं
स्वतःला, स्वतःमध्ये कोंडून घेतलं

राग नको, द्वेष नको, नको भांडणतंडण
कोणी बदलो की ना बदलो, आपण भले, आपले काम भले
बापाचे मन मागे हटले, सवयीचे दास सोडून दिले
एकेक पाऊल, पुढे-पुढे टाकले, स्वतःला युनिक बनविले

बापाने ठरविले, शांतपणे आपले विश्व मोठे केले
दुनिया तिच्या तालात, तिकडेच मरू द्यायचे, म्हणून हसला गालात
बाप एकेक विचार करायचा, हळूहळू मौन पाळायचा
आणि निश्चिंत असायचा, पण आईचा जीव गुदमरायचा

इथे सारे निमित्त घडते, कोणी कोणाचे ऐकत नसते
उगीच तोंड वाजवून, एनर्जी वाया घालवायची नसते
आपल्या आयुष्याचं केंद्र, कोणीच बनत नसते
स्वतःची वाट, स्वतःच तुडवायची असते

खूप सारा विचार करून, बाप संयमाची प्रॅक्टिस करतो
कोणी तरी पाण्यात बुडतो, त्याला जगवण्याचा विचार नसतो
अनुभवाच्या ठोकरा खाऊन बाप शहाणा बनतो
लोकांना तो स्वार्थी आणि अंहमी वाटतो, बापाला काही फरक पडत नसतो

*** *** ***

१८. बाप : सच्चा दोस्त

बापानं पार्टी दिली, मित्राला जास्त झाली
रंगलेली पार्टी संपली, बापानं गाडी काढली
मित्राला सांभाळून घरी नेलं, त्याच्या बायकोनं तिरपं पाहिलं
धर्म करा आणि चावडी चढा, असंच त्याला झालं

सकाळी मित्राचं अंथरून ओलं दिसलं
त्याच्या कशाला नादी लागता, बाईनं म्हटलं
लोकांच्या तोंडालाही काम लागलं, एकानं सांगितलं
तुझ्या नावाने, त्याची फॅमिली खडे फोडते, डंका पिटते

बाप म्हटला, कोणाच्या तोंडाला का कुलूप लावता येते
बोलणाऱ्याला बोलू द्यावं, त्याला त्याच्या स्वभावावर सोडावं
लोकांना कळायला हवं, फुकट भेटतं म्हणून, का जास्त घ्यावं
कोणाचे पैसे काही वर येत नसतात, लोकं उलट्या बोंबा मारतात

एकाला झटका आला, त्याच्या बाईनं फोन केला
बाप लगेच निघाला, त्याला दवाखान्यात नेला
बरं झालं लवकर आणलं, संकट टळलं, डॉक्टरनं सांगितलं
बाई तर बील पाहून चिडली, बापालाच रागावली

हा डॉक्टर, लय पैसे खातो, इथे का आणलं
चिंता करू नका, पैसे मी आणतो, बापानं म्हटलं
आईचं सोनं मोडलं, बापानं बील भरलं, घर मोडून तीरथ केलं
पण मित्र वाचला आणि बापाला आनंद झाला

बाप भावनिक बनून जगला, फक्त माणुसकीने देत गेला
सगळ्यांनी त्याला कमजोर ठरवला आणि हलक्यात घेतला
नरम जमिनीसारखा समजला आणि खोद-खोद खोदला
बापाचा खिसा रिकामा होत राहिला, स्वतःवरच चिडला
बापचे डोळे उगडले, तेव्हा तो बिघडत गेला

सच्चा बनावं दोस्त, तर आपलेच तोडतात गोश्त
कर भला तो हो भला, असा जमाना नाही राहिला
लोकांना काही कदर नसते, चांगल्याची माती होते
स्वतःचे पाहिलेले बरे, आईने बापावर ओढले ताशेरे
बापाच्या डोक्यात वारे शिरले, आपुलकीची दारे बंद केले

*** *** ***

१९. थकलेला बाप

आयुष्याच्या शेवटच्या वळणावर, उंच टेकडीवर
डोक्याला हात लावून, उभा असलेला बाप
गोळा-बेरीज करत, चांगल्यावाईट जगण्याचे घेतो माप
म्हणे, भोगासक्तीचा मोह, असतो माणसाला ताप

गोड-गोड बोलणाऱ्या आणि छद्मी हसणाऱ्या
आप्तांची भावना आणि लालसा पोखरत होती
सगळ्यांना खुश करण्याची उमेद राखली होती
पण दूर पळाली नाती, बापाची झाली माती

सकार-होकार देतांना, सगळ्यांची मर्जी सांभाळतांना
बाप मेटाकुटीला आला आणि उपेक्षितही राहिला
उपकाराचे ओझे वाहून स्वतःची किंमत गमावून बसला
बाप सद्गुण सत्य-वचनी परोपकारी, मंडळी भेटली फायदा घेणारी
बापाचा चांगुलपणा, ठरला त्याची कमजोरी

कोणी नाराज होईल, कोण काय म्हणेल
म्हणून बापाने नकार पुसून टाकला
होकाराच्या ओझ्याने, बाप फार थकला

तरीही गोडबोल्या, ढोपर सोल्यांना देत राहिला
झोळी रिकामी झाली आणि जिंदगी फाटत गेली

आत्मसन्मानासाठी मर्यादा नाही आखल्या
सगळ्यांशी चांगले वागतांना चिंधड्या झाल्या
वेळ आणि ऊर्जा पाण्यासारखा वाटत गेला
बापाला प्लास्टिकचा ग्लास म्हणून वापरला
जसे- पाणी पिऊन झाल्यावर फेकून दिला

मतलबी दुनियेत, भला माणूस म्हणून
सुरक्षा आणि आत्मसन्मान गमावून बसला
अखेरच्या वळणावर पाहिला, थकलेला दिसला
मनाने उदासलेला बाप, आपलेच ठरले होते ताप

कुठं थांबायचं, कुठून पळ काढायचा
याची अक्कल-हुशारी नव्हती बापाला
नको त्याच्यावरही भरोसा ठेवला
स्वतःचे आयुष्य रिकामे करत गेला

अस्तित्त्वाचे संतुलन राखता नाही आले
गरीब बापाचे, लांडग्यांनी लचके तोडले

अखेरच्या वळणावर हातपाय ढिले पडले
बापाकडे पाहून सगळ्यांनी तोंड फिरवले

मतलबी हैं लोग यहाँ पे, मतलबी जमाना
सोचा साया साथ देगा, निकला ओ बेगाना
एफेमवर गाणे लागले, बापाच्या डोळ्यात आसू आले
बापाने मागे वळून पाहिले, कोणी नाही दिसले
मन,भावना आणि शरीर, सगळे काही थिजले

*** *** ***

२०- बापाचा बळी

बाई प्रेमाचं नाटक करते, त्याला बंधनात ठेवते
बापाची ऊर्जा, पुरुषत्त्व, स्वातंत्र्य ताब्यात घेते
तिच्या मर्जीने चालवते, मनासारखं जगू देत नसते
भावनिक खेळी करून, त्याला गुलाम बनवते

मुलांना जन्माला घालते, जबाबदारी त्याच्यावर टाकते
म्हणे तुमची पैदास तुम्ही सांभाळा, नाही तर हो मोकळा
बापही कर्तव्य म्हणून सुतासारखा सरळ होतो
बायको-मुलांसाठी जीवाचे रान करतो

मुलं मोठी होतात, बापाला नवसाचा बोकड समजतात
बापावर हक्क गाजवतात, इच्छा पूर्ण करून घेतात
बाप कमी पडला की, जन्माला का घातलं, म्हणून
अधिकाराने जाब विचारतात, बापाचा अवमान करतात

स्त्रीधार्जिण्या समाजाची महिमा, राखत नाही बापाची गरिमा
मुकाट्यानं घर सांभाळणं, माणसाचं काम आहे म्हणून
बापाला फेकतो टोमणे मारून, बाप जातो जिवंत मरून
लोकांच्या लोकलाजेने, बाप जगतो अस्वस्थ मनाने

बाईची जागा बाहेरची घेते, बापाला मोहित करते
मेनकेच्या नादी लागून, बापाची तपस्या भंगते
सुंदर चेहरा, एक स्मित, एक नजर त्याला घायाळ करते
घरी, तेच बाहेर, फक्त नमुना बदलतो आणि बाप फसतो

चिखलातून बाहेर पडू पाहतो, कायदा स्त्रीची बाजू घेतो
खोट्या आरोपाने जेरीस येतो, ब्लॅकमेल केल्याने मोडून पडतो
बुडावर बसलेला घाव, कोणाला दाखवता येत नसतो
घरचं सोडून बाहेरच्या नादी लागल्याने बापाचा बळी जातो

अनोळखी वॉट्सअप कॉल आला, बापाने सहज उचलला
कोणी एक बाई गोड बोलली, कैसे हो म्हणाली
बापाला वाटलं लॉटरी लागली, त्याची बुद्धी भ्रष्ट झाली
बाप तिच्या जाळ्यात अडकला, बाईने पाहिजे तसा लुटला
बाईने पोलिसाचा धाक दाखवला, कायदाही तिच्या बाजूने झाला

बापाच्या डोक्यात सायबर सेल आला
त्याने ऑनलाईन ई-मेल केला, एफआयआर नोंदवला
बाप वाट पाहून थकला, पण न्याय नाही मिळाला
सोशल मीडियानेही चांगला धुतला
समाजरूपी देवापुढे बळी देण्यासाठी ठेवला

*** *** ***

२१- बेइज्जत बाप?

बाप म्हातारा झाला, सतत ऑनलाईन राहिला
दात पडले, हाडं म्हसणात चालले
तरी त्याचे चाळे नाही गेले, असे लोकांना वाटले
बाप मोठा हौशी, लोकांची ऐशीतैशी, मन तरुण झाले

बाप म्हणे, माणूस शेवटपर्यंत घोडा असतो
थकत नसतो, धावत असतो
भेटली घोडी की पळत सुटतो
असा कुठे का बाप असतो

पण तो एक माणूस, कोणाचं ऐकत नसतो
धावतो-धावतो आणि खड्ड्यात पडतो
विषाची परीक्षा देतांना, जीव धोक्यात घालतो
म्हणे मृत्यूला घाबरत नसतो, म्हणून कशाची पर्वा करत नसतो

ऑनलाईन स्त्रीची फितरत जाणतो, वासनेपेक्षा पैशाला महत्व देतो
तिची चलाखी लक्षात येऊनही तिचा मित्र बनतो
बदनाम सारेच, म्हणून बाईची परीक्षा देतांना कॉपी करतो
लोकं स्ट्रिक सुपरवायझर, डीबार केला जातो

बाप खरंच इतका नालायक असतो ?
की, तो ऑनलाईन अभ्यास करतांना चुकतो
आणि जगण्याच्या परीक्षेत नापास होतो
बापाचं काही खरं नसतं, त्याचं गणित वेगळंच असतं

बाई म्हणजे व्हायरस, माणसाचा काढते कस
बापाचे डोके बधीर होते, साधीसुधी गोष्ट कळत नसते
करोनापेक्षा ऑनलाईनची बाधा घातक ठरते

लोकांना निमित्त हवे असते आणि बापाच्या नावाने अफवा पसरते
तोही मोठा बहाद्दर, त्याला कोणाशी घेणेदेणे नसते
बाईनेच त्याला चेतवलेले असते, त्याची काही चूक नसते
पण कोणा-कोणाला सांगणार, दुनिया तर उलटीच चालणार

ऑनलाईनच्या दुनियेत, बापाची प्रतिमा डागाळते
विवस्त्र दुनियेतील किड्यांची त्याला पर्वा नसते
बापाचे मानसशास्त्र असे कसे असते
जनाची नाही, तर मनाचीही चाड नसते

मनं मारून जगणाऱ्या, दुसऱ्याच्या आयुष्यात इंटरेस घेणाऱ्या
मूर्खांच्या नादाला, बाप नाही लागला, सावरून धरले स्वतःला
धुतल्या तांदळाचे इथे कोण आहे? बापाच्या मनाला प्रश्न पडला
दिव्याखाली अंधार, मग प्रकाशाची हौस कशाला
त्यांचं तसं आपलं आणि ऑनलाईनचं भूत काढून फेकलं

डिजिटल इंडिया, नकोच मोह-माया, बापानं मनाशी म्हटलं
सशक्त व्यावहारिक उपयोगासाठी इंटरनेटचं जाळं पसरवलं
त्यात अडकून पडायचं नाही, ठोकर लागल्यावर जाणलं
जगाकडे तोंड फिरवलं, बापाचं गणित बापानंच सोडवलं

*** *** ***

२२ - स्टोइक बाप

ग्लोबल दुनियेत माणसं, जंगली प्राण्यांसारखे
घात लावून बसले, माणसाचीच शिकार करू लागले
वाघ, सिंह, लांडगे, कोल्हे, तळस, बाकी सारे बेबस
हरीण, म्हशी, गायी ससे, तसे दुबळे माणसे बळी गेले

लोकांनी आजारी पडावे, औषधं खाऊन जगावे
म्हणून डॉक्टर, औषध कंपन्यानी संगणमत केले
माहिती तंत्रज्ञान, सोशल मिडियाने खतपाणी घातले
लोकांना बरे करण्याचे मार्ग नेटवरून हटवले
दवाखाने आणि मेडिकलच्या जाहिरातीचे पेव फुटले
लोकांना सदृढ होऊ नाही दिले, त्यांचे दुकानं चालू ठेवले

बाप त्यांचाही निघाला बाप, त्याने पाहून घेतला ताप
बापाने स्वतःला ओळखले, सगळ्यांचे धाबे दनाणले
मौन, सक्रिय ऊर्जा म्हणून, त्याने जाणून घेतले
बोलण्याने तोंड दिसते, म्हणून शांत राहावे लागले

राग गिळून घेतला आणि बाप स्थिर झाला
स्वतःला नवा जन्म देण्यासाठी संयम बागळाला

प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ओरबडणाऱ्या दुनियेपासून
बाप दूर होत गेला आणि त्याच्या बिळात घुसला

नाही प्रतिक्रिया, नाही एक्सप्लेन, फक्त ध्यान
दुनियेच्या गोंधळापासून शांत केले मन
नसतो फायदा, फुकट वेळ व ऊर्जा खर्च करून
खामोशी व दुरी, बापाने घेतले सूत्र ठरवून

भीती, एक भ्रमाचा भोपळा, म्हणून टाकला फोडून
उंदरासारखे जगणे नको, मनात घेतला सिंह कोंडून
आत्मविश्वास आणि धैर्य बाजारात विकत मिळत नसते
थोडं-थोडं आतून उगवते, हळूहळू अनुभूती येते
रोज प्रॅक्टिस करावी लागते, बापाची एकदम ट्यूब पेटते

पाला-पाचोळ्यासारखे हवेत उडणारे
मन, बुद्धी, भावना, विचार जमा करून
बापाने टाकले जाळून, सोनं घेतले त्या राखेतून
जगण्याचे अंतिम उद्देश ठरवून, त्यावर लक्ष केंद्रित केले
कणखर पुरुषत्त्वासाठी नवे सूत्र शोधून काढले

एकसाची पद्धतीने जगले ते सजा भोगत राहिले
जगण्यात असावे थ्रील, बंद कपाटाचे तोडावे सील
दोन दिवसाची जिंदगानी, आपल्याच तालात गावी गाणी
लोकं मोठे कलाकार, फुकट कोणी देत नाही पाणी

भ्रमाचा भोपळा फुटला, बापाच्या डोक्यात फरक पडला
गर्दीतील ताण आणि उपद्रव टाळत गेला, सगे-सोयरे विसरला
शिकार नाही तर शिकारी बनला, त्याच्याच धुंदीत नाचला
ना कॉल ना मेसेज केला, लोकं म्हटले, अहंकारी बनला
बापाला काही फरक नाही पडला, त्याच्या मिशनवर निघून गेला

*** *** ***

२३ - युनिकबाप

दुनियेकडून नकाराच्या ठोकरा लागल्या
ठेचाळलेल्या मनात रक्तधारा वाहिल्या
धैर्यशील बाप स्वतःशी लढत गेला
जग जिंकण्याचा आत्मविश्वास निर्माण केला

कोणासाठी जगणं थांबवायचं नसतं
इथे सारं अस्थिर असतं, बापाचं मन म्हणत होतं
हातातलं पकडायचं, बाकी सोडायचं असतं
बापाने तेच केलं, स्वतःमध्ये स्वतःला गाडून घेतलं

इमानदारी हीच कमजोरी, तरी नाही केली बेफिकीरी
दुसऱ्याचे भले करतांना, एकटेपण भोगतांना
दुःखाचे रुपांतर ऊर्जेत केले, वेळेला पकडून ठेवले
कोलमडून पडतांना स्वतःला सावरले, जगण्याला नवे आकार दिले

दुःखाची गाथा उगाळत न बसता, भावनांना कुंपण घातले
बोलणे कमी, जास्त ऐकले, व्हॅलीडेशनला सोडून दिले
ताण आणि निराशेने तोडले, तेव्हा बापाने स्वतःशी युद्ध छेडले
स्वतःला स्पष्ट नजरेने पाहिले, नवे मार्ग निर्माण केले

भीती दुर्बल बनवते, दुर्बलता माणसाला निष्क्रिय करते
बापाचे स्पष्ट मत होते, तेच मनातून काढले की, दिशा बदलते
मग स्वतःच्या सोयीने विचार करून, स्वतःवर विश्वास ठेवून
बापाने पहिले प्रयत्न केले, मग चांगले परिणाम अनुभवले

बापाने तेच केले, चारचौघांसारखे दिवस नाही घालवले
जे जे लाखातले एक होते, त्यांनाच डोळ्यासमोर ठेवले
एकेक पाऊल, त्यांच्या पावलावर टाकले
मागचा वारसा पुढे नेण्यास योगदान दिले, पप्पा युनिक ठरले

दुनियाको रियाक्ट करके जबाब नहीं देना, रिझाल्ट देके जवाब देना
स्पीड आणि परपझ, बुद्धी, निर्णय आणि सवयी
अर्जन्सी,ऍकशन, क्रिएटीव्हीटी, ऐसे ही चलना
बाप शिकला म्हणा, कमालच आहे ना?

बदलाव की शुरुवात भितर से होती है
बोलणं बंद आणि बदलणं सुरु केलं
एक क्लिक झालं आणि बापाचं नवं विश्व बनलं
बापाच्या म्हातारपणाला नव तारुण्य लाभलं

बाप जन्मतः दरिद्री भिकारचोट होता
मरतांना मात्र करोडपती म्हणून मेला
सिकंदरासारखा जग जिंकत राहिला
रिकामा आला होता, शेवटी रिकामाच गेला
पण खऱ्या अर्थाने जगला, अमर झाला

*** *** ***

२४ - बाहेरख्याली बाप

बाप कामेच्छेचा बनला दास, सतत असे उदास भकास
घर की मुर्गी दाल बराबर, मनोमन समजू लागला
चित्त त्याचे ताळ्यावर नसे, उठसूठ घराबाहेर असे
आई त्याला सांभाळते, तरीही त्याचं डोकं भनकते

बापाचा चेहरा अस्थिर, मन झाले बधीर
वासनेच्या आगेत बुडाला, सत्यानाश करून घेतला
समजला नाही दुनियाची रीत, गात होता प्रेमाचे गीत
कोण्या बाईला केले नमन. जसा सांड करे गाईकडे गमन

बापाला चुडेल बिलगली, त्याची बुद्धी भ्रष्ट झाली
तो गेला बाहेरख्याली, नाही घरची ख्यालीखुशाली
घरी करे चिडचिड, थोड्याशा कारणावरून तोडफोड
नाही मुलाबाळांचा विचार, आई बनली लाचार

बापाच्या शरीराची ऊर्जा, नको तेथे खर्च झाली,
माय उघड्यावर पडली,नशिबाला दोष देत राहिली
स्थिर व शांत जगावं माणसानं, नाही दिली बापाला शिकवण
भलते नाटकं केले घरात, मुलं नव्हते त्याच्या ध्यानात
बिघडला बाईच्या नादानं, बायको-मुलांची केली बोळवण

बाप गेला पळून , आईच्या पुढे यक्षप्रश्न
मुलं पदराखाली घेऊन, रात्री काढल्या रडून
आई सुंदर असूनही, बाप निघाला चावट
कोण्या डाकीणच्या सावलीने, घरात पसरले सावट

नुसतं शरीराचं आकर्षण, त्याला प्रेम कसं म्हणावं
देहाच्या क्षणिक सुखासाठी, त्यानं पत्नीला का सोडावं
बाप कामांध बनल्याने, पत्नीचे प्रेम कळले नाही,
त्याची चाहत विकृत झाल्याने, प्रेम आणि वासनेतील फरक जाणला नाही

बायको म्हणजे, सृष्टी आणि सृजन
सोपं होतं हो समजणं, पण बुद्धी ठेवली गहाण
मजनूसारखा भटकत राहिला, रक्ताच्या नात्याला कलंक लावला
बापाला होते मोकळे रान, बाहेर जाऊन खाल्ले शेण

देह-मनाच्या संघर्षात, जाऊन पडला खड्यात
वासनेच्या भुकेसाठी, किडे पडले होते डोक्यात
परस्त्रीच्या मोहापायी आत्मा विकला आणि खल्लास झाला
गोंडस मुलं आणि सुंदर बायको विसरला, संसाराचा सत्यानाश केला
मुलं बापाविना जगली, आईला सन्यास घडला, दोष द्यावे कोणाला?

*** *** ***

२५ - संशयी बाप

का बोलते याच्या-त्याच्याशी, म्हणून बाप छळतो
आईच्या तोंडाला कुलूप लावतो, डोक्याला ताप देतो
साध्या कुरियरवाल्याशी बोलतांना, त्याच्या मनावर परिणाम होतो

बाप प्रेमाचा देखावा करतो, पण, मनात संशय घेतो
जसा विषारी किडा डोक्यात वळवळतो, वरवर शांत दिसतो
तिला बऱ्याचदा टाकून-पाडून बोलतो, बाप असं का करतो
मुलांच्या बालमनाला काहीच अर्थ लागत नसतो

आई खुंट्याला बांधलेल्या गाईसारखी, खाली मान घालून मूक राहते
चोरी केली नसतांनाही, तिला बापाकडून शिक्षा मिळते
बापाचे आदिम संशयी मन काही कळत नसते
थोड्या-थोड्या गोष्टीने त्याचे डोके भडकते

ती मोबाईलवर ऑनलाईन असते, कोणाशी चॅटिंग करते म्हणून
बापाची तिरपी नजर तिच्याकडे जाते, चोराच्या मनात चांदणे वाटते
ती मोबाईलवर बोलत राहते, त्याची नस तडकते
संशयाची लाट उसळते, तिची उलट तपासणी होते

बाप संतापून बोलतो, काय करते एवढं मोबाईलवर
कामं नाही का डोक्यावर, बिचारीचा जीव होतो खालीवर

रिकामे धंदे करशीन तर हात-पायच मोडीन म्हणतो
तिच्यासाठी लक्ष्मणरेषा, पण स्वतः जसा गायीमागे बैल फिरतो

घरी येऊन गेला कोणी, तर त्याचा तीळ पापड होतो
मांत्रिकाने झापाटलेल्याला कबलवावे, तसा आईला छळतो
कुठे भेटला होता तो, सांग म्हणतो आणि फटके देतो
ती मुलाबाळाच्या शपथा घेऊन तसं काहीच नाही म्हणते
पण संशयाच्या भुतामुळे बापाची बुद्धी गहाण पडते

बाजारात दिसला कोणी, तिच्या ऑफिसातील माणूस
बाप समजतो त्याला पाखरू आणि तिला कणूस
ती जसे शेतातील उभे पीक वाटते, गुरा-ढोरांची शंका येते
भ्रमविकृतीनं पछाडून जातो, उगीच तिची राखण करतो

स्त्रीस्वातंत्र्याच्या गप्पा मारतो, पण तिला माणसांपासून दूर ठेवतो
घराबाहेर पडलेल्या आईचे नेहमी लोकेशन विचारतो
स्वतः मात्र दुसरीचे लोकेशन घेतो, उलटा चोर कोतवालला रागावतो

बाप फार नाटकं करतो, एखाद्या सोंगाड्यासारखा वागतो
घरात तमाशा करतो, वरतून साळसूदसारखा राहतो
भ्रमविकृतीला बळी जातो आणि बाप आईला छळतो
त्याची नजरच वहिमी, म्हणून तिला खुंट्याला बांधतो

*** *** ***

२६ - नाराज बाप

वर्ष आले आणि गेले, असे एकूण तीन झाले
संसाराच्या वेलीवर, पहिले एक फूल उमललेले
आई सृजनतेची बाग बनली, बापाच्या डोक्यात ईर्षा घुसली
आपल्याला असता पहिला मुलगा, तर चिंताच नव्हती कसली

आईनं बापाकडे पाहिलं आणि म्हटलं, ते काय आपल्या हातात असतं
बापाच्या मनात वेगळंच होतं, म्हणे बोलायला काय लागतं
आता मुलगाच होऊ दे, तुझी अक्कल बाजूला राहू दे
वरवर ठीक आहे म्हटलं, पण त्याचं डोकं फिरलं

होता दुसराच महिना, तिला काही सुचेना
बाप मोठा हट्टी, तिचं काही ऐकेना
दवाखान्यात जाऊन खूप प्रयत्न केले
बेटी बचाव, बेटी पढावने शक्य नाही झाले

बापाने सगळीकडे पाहून घेतले
शेवटी परिस्थितीपुढे हात टेकले
तरीही आईला डॉक्टरकडे नेले
दोघे दवाखान्याची एकेक पायरी चढले

गर्भजल चाचणी कायद्याने गुन्हा आहे
त्या पाटीकडे पाहून, बापाच्या काळजाचे ठोके वाढले
त्याने डॉक्टरला विनंतीपूर्वक हात जोडले
कितीही पैसे लागो, एवढं काम करा
पण डॉक्टर काही, नव्हता बिचारा

तसं नाही साहेब, कायदा लय कडक
तसं केलं तर, सरकार दाखवतं सडक
मग का आम्ही रस्त्यावर यायचं
ते ऐकून, बापाला सुतक व्हायचं

अहो, सिंगल गर्लसाठी शासनाच्या
खूप योजना आहे, असू द्या एक मुलगी
डॉक्टर म्हणाले, बापाचे डोके भनकले
आगेचे डोम विजवून, नाराजीने ओके म्हटले

बापाला डॉक्टरचं म्हणणं नाही पटलं
एकच मुलगी नको, डोक्यात मुलाचं खूळ भरलं
माय गरीब गाय, तिचं तरी काय चुकलं
बाप म्हणेल ती पूर्व दिशा, तिची झाली दुर्दशा

मुलगाच होऊ दे, बापानं हजारदा म्हटलं
नाही तर तुझं काय, तिकडेच जाऊ दे
बापानं धमकावलं, आईचं मन खट्ट झालं
दगडावर डोके आपटणे नको, म्हणून मौन स्वीकारलं

दिवस नाही थांबले, बापाचे टोमणे चालूच राहिले
हिला आणि तिला पाहा बरं, मुलं कसे होत गेले
एक दिवशी आईला भरती केले, तिचे सिझर झाले
बाहेर बापाने मुलगाच असू दे, म्हणून देवाला हात जोडले

डॉक्टर येऊन म्हणाले, अभिनंदन ---
मुलगी झाली, जिलेबी वाटा आता
बापाने मनात म्हटले, मारा याला लाता
तिकडेच शिलगा, कशाला दवाखाने चालवता

जनाची जनरिती, जणगणमन, उरलं नाही भान बापाला
आईला भेटला, तरी म्हटले नाही, इकडे आण मुलीला
बापानं समजून नाही घेतलं, तिला फार वाईट वाटलं
आपल्या हाती काही इलाज नसतो, तिच्या ओठावर आलं, पण ---

थोबाड्यात मारल्यासारखा त्याचा चेहरा पाहून
आईनं तोंड लपवलं, त्यानं लक्ष नाही दिलं
आपला काय दोष म्हणून, आईने स्वतःच्या मनाला समजावलं
आईच्या डोळ्यातील पाणी, त्याला नाही दिसलं

*** *** ***

२७ - कंजूस बाप

बाजार करायचा, तर जाऊन येजो
काय आणायचं आणजो, पाचशे रुपये घेजो
बापानं सांगलं, आईनं म्हटलं, तेवढ्यात होत नाही आता
बाप मनात म्हणे, पैसे वाचवून, माहेरी कसे देता येता

मनातले बोल मनात गिळले, मिठासारखे तोंडात विरघळले
पण बापाच्या कडू शब्दांनी तिला चोर ठरवले
येतांना आणेल म्हणून सांगितले, तिला विश्वासात नाही घेतले
बाजाराचे दुखणे गेले, म्हणून तिलाही बरे वाटले,

संध्याकाळी बापाने बाजार आणला
आईने नजर टाकून, डोळे भरून पाहिला
पिशवीचा कोपरा, लय रिकामा दिसला
एवढाच का? आईनं विचारलं, तर बाप फक्त बारीक हसला

झेडपीत जाऊन येतो जरा, तसाच जाऊन येईल डी.मार्टला
काही आणायचं का तुला? बापाच्या प्रेमाला ऊत आला
नेहमीसारखे बापाचे मन ओळखले, आईने मूग गिळले
कितीही करून दिली यादी, तरी अनेकदा सामान कटच केले

म्हणे काय तं इतके पैसे वाचवले, खायला काही नाही आणले
पोरांना काजू बदाम सांगितले, तर खारी, बिस्कीट आणले
त्यांचे पोटं बिघडले, म्हणे पोरांकडे लक्ष का नाही दिले
माणसांपेक्षा पैशांना किंमत, सुख देण्याची नाही हिंमत

आईला ताप आला, उठायला उशीर झाला
काय झालं आता, बाप म्हणाला
अंगाला हात लावला, तर चटका लागला
खातापिता, कसे काय रोग होता,बाप म्हणाला
आईने डोळे मिटले, बापाने खिशाकडे पाहिले
मेडिकलवर जाऊन औषध आणले

दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा
खरेदीच्या घाई-गडबडीत, बाप झाला लोटा
शॉपिंगला जायचं म्हणे, तयारी करा
कपडे घेतांना बिलावरच नजरा
किंमत जास्त म्हणून, चांगलं नाही म्हणे
जसे- हवे त्याला चणे आणि फुटाणे

पै-पाहुणे येती घरा, तोच दिवाळी-दसरा
बाप म्हणे आईला, आता सगळे विसरा
रिकामे येऊन बसतात, डोक्याला ताप देतात

सासरवाडीला मात्र राजासारखा खातो-पितो
सासूसासरे घरी आले की कपाळाला आठ्या पडतो
पगार झाले नाही म्हणून, आईला चूप बसवतो

मित्र मंडळीच्या गर्दीत, बाप चोरासारखा राहतो
पार्टीचं नाव काढलं की, कशाची देऊ म्हणतो
मित्राच्या पार्टीला, चाटून-पुसून घशापर्यंत खातो
द्यायच्या वेळेस दूर पळतो, उपवासाचं कारण सांगतो
फुकटात भेटलं की हौस फेडून घेतो, बाप फार हुशार दिसतो
बाकी मन मारून राहतो, बचत करण्यात पटाईत असतो

इच्छा झालीच अधून-मधून तर
बाप एकटाच हवं ते घेऊन येतो
जसा- एकीकडे बसून, कुत्रा हड्डी चघळतो
पार्टीत अर्धा-पाऊण पीस एकटाच हाणतो
सगळ्या घरासाठी मात्र अर्धाच किलो आणतो

बऱ्याचदा इच्छा झाली तर कोणाच्या तरी
आमंत्रणाची वाट पाहतो, नाहीतर तसाच राहतो
दात कोरून पोट भरतो, इच्छा मारून जगतो
खाली हात आला, खाली हातच जाणार
सिकंदरचा इतिहास, त्याला कधी कळणार

*** *** ***

२८ - व्यसनी बाप

बाप पिऊन आला की, पहिलवान होतो
येऊन-जाऊन, आईशी कुस्ती खेळतो
अभियान चालतं, व्यसनमुक्त भारत
पण, बाप असतो, आईला मारत

बाप पितो आणि झोडतोच, असं नाही बरं
त्याचं बोलणंच फार भयंकर असतं
जिव्हारी लागतं, काळजाचं पाणी होतं
बापाला पश्चाताप होत नसतो, भगतासारखा डुलत असतो
आईचा नाईलाज होतो, घराचा कोपरा आधार वाटतो
एकेक थेंब तिच्या डोळ्यातून टपकतो

मुलं अभ्यासाला बसलेली असतांना
आईशी बडबड आणि किरकिर करतो
अभ्यास तर मुळीच घेत नाही
सिगारेट ओढून, घरात धूर सोडतो
लाडात आला की, जानू, चकणा दे की
झाडावर चढवून, आईला भीक मागतो

बाप लावतो लाडीगोडी, आई भलतीच वेडी
त्याच्या सेवेला जुपून घेते, तिची फार फजिती होते
चढती आली की, बापाची गाडी घरघर करते
सतत धक्के मारते, मध्येच बंद पडते
प्रवासाला नाट लागते, त्याच्यासोबत बोअर वाटते

मुलं अभ्यास सोडून, टीव्ही पाहतात
अभ्यास कमी आणि टाइमपास जास्त करतात
पप्पा बेवडे म्हणून नशेत असतात, तरीही
मुलांच्या काळजीने, टीव्ही बंद करतात

शुद्धीतल्यापेक्षा, पिल्यावर खरं बोलतात
मनातलं सारं ओकून टाकतात
सकाळी उठून, आईला विचारतात
म्हणे, काही झालं होतं का रात्री ?
आई फार भित्री, शब्दांना लावते कात्री

रात्री पाहिलेला बाप बेवडा
सकाळी वाटतो केवढा? – तर आभाळा एवढा
माडासारखा जाणवतो, फारच उंच
बायको-पोरांसाठी झिजतो, एकेक इंच

त्याच्या कष्टाला नसते मोल, लक्षात राहतो गेलेला तोल

दिवसभर चांगला राहतो, संध्याकाळीच का पांगतो
कोणाला कळू देत नसतो, पिल्यावर चिडचीड करतो
ज्याच्या-त्याच्या कानात मळ जमतो, कोणीही ऐकत नसतो
आलेले दिवस, असेच निघून जातात, बापाला शुल्लक समजतात

का? कुणास ठाऊक?, कोणी नाही समजून घेतले
सगळ्यांनीच बापाला वाईट ठरविले
त्याच्याकडून चांगलेपणाची अपेक्षा करतात
पण, स्वतःकडे पाहत नसतात, आतल्या गाठीचे दिसतात

बापाचे नाही ऐकले, उलट त्याला पागल ठरविले
स्वतःची खराबी करणे, त्यालाही नको वाटले
पण, मेंदूतल्या डोपामाईनने बाटलीत बुडविले
त्याचे दु:ख त्यालाच कळले आणि पेगवर पेग रिचविले

*** *** ***

२९ - चिडखोर बाप

दोन टाईम जेवण बनवते, वाढून देते
म्हणजे काय? फार उपकार करते
बाप डोळे ताणतो, त्याचा अर्थ तिला कळत नसतो
पक्ष्यांची किलबिल, तसा तो बडबड करतो

घराबाहेर पडला की कुत्र्यासारखा शेपटी हलवतो
याच्या-त्याच्यापुढे लाळ घोटाळतो
बापाला आवडत नाही, पण नाईलाज असतो
घरात मात्र त्याचा बीपी वाढतो

चहात साखर जास्त झाली की रागावतो
म्हणे, तुझ्या बापाने का साखर कारखाना काढला
दोन धारा लागतात, तिच्या डोळ्याला
काहीच कसे वाटत नाही बापाच्या मनाला

कधीकधी भाजीत मीठ नसलं की आडवं बोलतो
मिठाच्या सत्याग्रहात, दांडी यात्रेला
तुझी आजी, गेली होती का म्हणतो
येऊन-जाऊन षटकार हाणतो

तिनं काय करावं, काय करू नये
म्हणून, बाप तिच्या मागे लागतो
त्याचा आवाज, इतका ढोरासारखा की
आईच्या अंगाचा, थरकाप होतो

रात्रीची उतरलेली असली तरी
रक्त सळसळ करतं आणि रागराग करतो
ड्युटीवर जाण्याच्या गडबडीत असतांना
हे कर, ते आण, म्हणून आईला पळवतो

घराबाहेरचे सारे ताण, डोक्यात भरून आणतो
वेडा होऊन आईला, दगडासारखे मारून फेकतो
या ना त्या कारणांनी बडबड चालूच ठेवतो
तिचाही पारा चढतो, तेव्हा लगेच खाली येतो

घरातल्या सगळ्यांकडे अपेक्षेने पाहतांना
बापाच्या मनासारखं झालं नाही की
त्याच्या सहनशीलतेचा बांध फुटतो
वड्याचं तेल वांग्यावर काढतो, उगीच काळजी करतो

स्वयंपाक उशिरा करते, भाजी चांगली नसते
एक ना अनेक कारणांनी, बाप भोंगा वाजवतो
आईच्या सात पिढ्यांचा, उद्धार करतो
बाप का चिडतो, मुलांना प्रश्न पडतो

बापाची पुंगी का वाजत असते, कोणालाच काही कळत नसते
आई सवय करून घेते, तिच्या कामात राहते
मुलांच्या अभ्यासात बापाची वजाबाकी होते
मुलांच्या यशाची मात्र फुकट काळजी वाटते

बायको-मुलांच्या प्रेमापोटी, घराच्या सजावटीसाठी
त्याची कटकट चालते, पण बिपी आणि शुगर वाढते
स्वतःलाच कशी घालावी समजूत, त्याचे त्यालाच कळत नसते
सगळ्याच चुकांचे खापर तिच्या डोक्यावर फुटते

*** *** ***

३० - देहासक्त बाप

आईला माहेरची ओढ, तिला बापाची जोड
सासूबाईची लालसा, बाप करे जलसा
जसे गौळणीचे देखणेपण, बापाचे फिरले मन
एकवर एक फ्री, आणखी एक तिसरी
बापाची रुची वाढली, त्याने सोंगाड्याची नक्कल केली

सासरा गेला देवाघरी, आली जावयावर जबाबदारी
आई बापाला घेऊन, माहेरची करे वारी
सहवास आणि आकर्षण, मोह आणि वासना
जडले जावयाचे प्रेम, सासूशी केला गेम
रतीसुखाची आदिम भूक, जावयाला संमती मूक

आईने केला काना डोळा, पिंडदानाला शिवला कावळा
म्हणे काळ बदलला, जुने ॲटिट्यूड कशाला
सासू जावयाचे प्रेम, वाटे जिव्हाळा आईला
सालीही करे कौतुक, वाढे जिजूची भूक

बाप मोहात अडकला, वासनेचा दास बनला
एक इच्छा पूर्ण झाली की, दुसरी तयार असे

बापाचे खालीपण, त्याचे मन भरत नसे
स्त्रीदेहाची आसक्ती, भुकेसाठी केली भक्ती

आई जाई शॉपिंगला, स्पेस मिळे बापाला
सांग कधी कळणार तुला, भाव माझ्या मनातला
बापानं गाणं गुणगुणलं, सासूचं मन चेतवलं
आतुरले मन, नाही नात्याचे भान
आसुसले नर-मादी, सासूनं सजवली गादी

फार लाडाची साली, बापानं आईस्क्रीम आणली
आई मनानं मोकळी, सहन केली पोकळी
बापाचा झाला दुरावा, नाही आईला परतावा
तिला दिला नकार, ठेवली सालीवर नजर
आईनं मनाला समजावलं, पण ते घुसमटत राहिलं
बाप घराचा आधार, म्हणून कोणी नाही बोललं

** ** **

३१ - भित्रा बाप

टेबलावरच्या फायली बाजूला ठेवून
बाप सोशल मीडियावर रील पाहतो
साहेब फाईल घेऊन बोलावतो
बापाच्या काळजाचा ठोका चुकतो
कामचुकार असल्याने ताण वाढत जातो

कामात लक्ष घालत नसतो
सहकाऱ्यांसोबत गप्पा मारतो
कामापासून पळ काढतो, म्हणून टेन्शनमध्ये येतो
बेफिकिरीमुळे बापाच्या काळजाचा ठोका चुकतो

बाप स्वतःला ओळखत नसतो आणि चिंता करत बसतो
रिकाम्या वेळी बेचैन असतो
पण, स्वतःशी नाते जोडत नसतो
बापाच्या काळजाचा ठोका चुकतो

चारचौघात, स्वतःवर विश्वास नसतो
मनामध्ये नको त्या शंका पेरतो
कोणी काही म्हणेल का, म्हणून

लोकांच्या विचारात बुडून जातो
आणि आतला चेहरा लपवत असतो
सकाळी उठून दूध आणतो
आणखी काही घ्यायचं राहिलं का
ती काही म्हणेल का, नको ते विचार करतो
पुरुष असून सशासारखा घाबरतो
ठीक चाललं असतांना काळजाचा ठोका चुकतो

आईने सांगितलेले कामं, बापाला परीक्षाच वाटते
सामानाची यादी, त्याच्या मनात घोळते
पुन्हा हे आणा, ते आणा, म्हटलं की,
लगेच गाडी काढून गावात जातो
आईच्या भीतीने, बापाचा वेग वाढतो
साहेबांच्या कामाला मात्र वेग मंदावतो

मुलं आईच्या पक्षात सामील
बाप एकटा पडतो, विचार करत बसतो
मुलं ऐकत नाही, त्याचा इगो हर्ट होतो
मारणे तर लांब, रागावतही नसतो
भावूक बाप हळवेपणाने पोरांना घाबरतो
प्रेमापोटी लाड करतो, त्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करतो

कमजोर ठरतो आणि त्याच्या काळजाचा ठोका चुकतो

आप्तजणांकडून स्वीकार, मानसन्मान
मिळण्याच्या विचारात, अकारण टेन्शन घेतो
हातून काही गडबड होणे नको
म्हणून आतला चेहरा सजवतो

व्हॅलीडेशन, अटेंशनचे भूत, बापाला झपाटते
दुसऱ्याकडून स्तुतीची अपेक्षा करतांना
स्वतःची ओळख पुसली जाते, काळजाची गती वाढते
बापाला अनाहूत पाहुण्यांसारखी बीपी आणि शुगर होते

कोणी काहीही म्हणो आपल्याला
नकोच कसली चिंता, कळत नाही बापाला
करावा स्वतःचा स्वीकार, होत नाही आजार
एकटेपणाच्या भीतीने होतो बेजार

स्वतःबाबत अजाण असलेला बाप
स्वतःपासून जातो दूर पळत
त्याच्या जगण्याचे गीत-संगीत
सभोवतीच्या चैतन्यमय सृष्टीत

पकडून ठेवता येत नाही मुठीत

बापाला सत्याचा विसर पडतो
अमावसेच्या अंधाऱ्या रात्रीत
हवेने वाजलेल्या दरवाजात
त्याला यम आल्याचा भास होतो
भीत्यापाठी ब्रम्ह राक्षस, मनोविकार जडतो
थोड्याशा कारणाने बापाच्या काळजाचा ठोका चुकतो

*** *** ***

३२ - दरिद्री बाप

बाप ग्रॅज्युएट झाला, संसारात पडला
नोकरी छोकरी, दोन टाइम भाजी-भाकरी
खाण्यावर भर देणार, दिमाग कसा चालणार
नाही परीक्षा, नाही अभ्यास, व्यवहारात नापास
तरी बाप, स्वतःला का समजतो खास

आहे तेवढ्यात समाधान, नको डोक्याला ताण
नाही जगाशी घेणंदेणं, बाजूला टाकतो घाण
कमजोर असूनही म्हणतो, मला द्या मान
सांगून ऐकत नाही, त्याच्या बुद्धीचे दारिद्र्य महान
रिकामेच असते बापाचे डोके, गरिबीचे पत्करतो धोके

कर्ज तेवढं करतो, हिशोब ठेवत नसतो
असलं की मजा मारतो, नसलं की मेंदू थिजवतो
चांगलं खायला पाहतो, पेपरची रद्दी विकतो
डोक्याने रिकामाच असतो, काही करत नसतो
खायला फार, भुईला भार, भेजा त्याचा सुस्तावतो

बापाजवळ कुठलाच विचार नसतो

डोक्याला ताण नको म्हणून, फक्त गंमत पाहतो
रिकामा वेळ घालवतो, नुसता खुर्ची तोडतो
मोजकंच बोलतो, बाकी वाफा फेकतो
सुविचारांच्या दुष्काळात उपाशी असतो

पाकीट पाहावे, तर बापाचे खिसे लाचार
आळस व बेफिकीरीने होतो बेजार
नाही सफलतेची हौस, पैसे मागतो उधार
भिकाऱ्यासारखा भगवान भरोसे, निर्लज्ज टाकतो उसासे
याची-त्याची उधारी, तोंड लपवतो भारी

बाप मनाचा दरिद्री, काळजाचा महाचोर
माणुसकीच्या नात्याला, असतो अवर्षणाचा घोर
देत नाही, पण गोड बोलून घेतो
प्रेमाच्या नाटकात, पहिला नंबर येतो
कळत नाही अशी, बेमालूम भूमिका वठवतो

कामसूत्राच्या सिनेमात, नायकाची भूमिका करतो
त्याचा अभिनय उठावदार, आईसाठी होतो उदार
म्हणे तुझं तू पाहा, आपल्यात ठेव अंतर
कामजीवन सोडून, बाकी बोल फार तर

आतुर झाल्या रात्री, आई करते दमन
बाप असा कसा वेडा, आईला शिकवतो धडा
म्हणे स्त्री-पुरुष समान, पण तिला बसवतो गुमान
सखा जिवाभावाचा वाटतो, तरी तिला उपाशी ठेवतो
पती-सुखाच्या बाबतीतही, बाप दरिद्री ठरतो

*** *** ***

३३ - स्वार्थी बाप

बाप माणसाची परिस्थिती पाहून वागतो
लोकांना कामापुरता मामा बनवतो
युजलेस माणसापासून दूर पळतो
तो काही कामाचा नाही म्हणतो

युज अँड थ्रोची भावना ठेवतो, कोणाला कळू देत नसतो
छुपा रुस्तम मूग गिळून बसतो, कामापुरतंच तोंड उघडतो
बाप भलताच चॅप्टर वाटतो, आलेली संधी कधी सोडत नसतो
खाउजाचे धोरण बाळगतो, स्वतःला हुशार समजतो, पण उघडा पडतो

मित्राच्या कठीण परिस्थितीत, बाप त्याला वाऱ्यावर सोडतो
खिसे रिकामे दाखवून, माणुसकीला कलंक लावतो
मैत्रीचे ओझे फेकल्याच्या आनंदात असतो, पण अपराधी ठरतो
त्याचे आतले मन त्याला डिवचते आणि त्याची झोप उडते

बाप सडक्या आंब्यासारखा निघतो
तोंडापुरता गोड बोलतो, मदतीच्या वेळी कीड दाखवतो
मित्र आणि परिचित फरक करत नसतो, सगळ्यांशी सारखा वागतो
बाप मोठा डूब्लीकेट दिसतो, मैत्रीला कलंक लावतो

जिथे भेटले चार यार, तिथे बाप बनतो घार
उंचावरून नजर ठेवून, खिशातील पैसे पाहून
गोडगोड बोलून, चांगला मित्र घेतो बनवून
स्वतःचे पाकीट मागच्या खिशात ठेवतो लपवून

बाप डोळे लावून दूध पिणाऱ्या मांजरसारखा राहतो
त्याचे खरे रूप कळले की, कोणीही बोलून दाखवतो
आप्तजणांच्या कुत्सित बोलण्याकडे दुर्लक्ष करतो
गंमत समजतो, बोलण्याने काही भोकं पडत नाही म्हणतो

बाप लोकांच्या बोलण्याला हवेत उडवतो
स्वार्थासाठी स्वाभिमान गहाण ठेवतो, फार लाचार वाटतो
मुर्दाड मनाचा बाप, स्वहितासाठी काहीही करतो
इभ्रतही पणाला लावतो, त्याच्या जगण्याला काही अर्थ नसतो

बाप मित्रप्रेमाला समुद्राच्या भरतीसारखे उधान आणतो
मित्राकडून पार्टी खातो, घरी तोंड पुसून, पान खाऊन जातो
बायकोसाठी आईस्क्रीम नेतो, तिला खुश करतो
तरीही तिच्या बोलण्याला घाबरत असतो

बापावर रागावलीच ती, तर मित्राची करतो माती
मी त्यातला नाही, म्हणून मित्राचे दोष सांगतो
बिचाऱ्या चिमणीला चालूचालू फसवतो
मित्राला विनाकारण बदनाम करतो

गोतावळ्यात स्वतःला झळ लागू देत नसतो
सगळ्यांकडून अपेक्षा करतो, आनंद मिळवतो
त्याच्याकडे आशेने पाहिले की निराशा करतो
वरतून त्याग आणि समर्पणाच्या गप्पा मारतो

बाप होकार मिळविण्यात आणि नकार देण्यात
लोकांना उल्लू बनविण्यात आणि गोड बोलून हित साधण्यात
अव्वल नंबर असतो, जसे गोल्ड मेडल मिळवतो
कोणत्या शाळेत शिकला, काही सांगत नसतो

बाप घेण्यात पटाईत असतो, देतांना पळ काढतो
स्वतःशिवाय त्याला, कोणी प्रिय नसतो
स्वार्थासाठी बाप स्वतःची इमेज विकतो
कोणी काही म्हणो, मनाला दगड बनवतो
गरज भागणं महत्त्वाचं, बाकी शुल्लक समजतो

लाज काढली तरी, हसण्यावारी नेतो
कामाचा माणूस तुटू नये, म्हणून शांत राहतो
बाप फार सिन्सिअर वाटतो, पण स्वार्थ त्याला लाचार बनवतो
त्याच्या जीवाला काहीच वाटत नसते, त्याची चाल लांडग्याची असते

बाप इतरांना कावळे, हरीण समजतो
कोल्हयासारखा धूर्तपणे त्यांना मूर्ख बनवतो
अनेकांची स्तुती करून हवे ते मिळवतो
गोड बोलून फसवण्यात बाप दस नंबरी ठरतो

*** *** ***

३४ - आळशी बाप

बाप दणकून खातो, सणकून झोपा काढतो
सूर्य घरावर येतो, तरी घोरत पडतो
झोपेतून उठला की घरचा चहा टाळतो
शुगर वाढल्याचे सांगतो आणि बाहेरून पिऊन येतो

बाप चिंता करत नसतो की, ताण घेत नसतो
जब के तब देख लेंगे म्हणतो
रात्री टीव्ही पाहत राहतो
आणि सकाळी उशिरा उठतो
दात घासण्याचाही कंटाळा करतो

काय करावे, त्याला काही सुचत नसते
आंघोळीचे गरम पाणी थंड होते
संडे म्हणून, अंघोळच करत नसतो
दिवसभर व्हाट्सअपवर टाइमपास करतो
बसल्याजागी खराखरा अंग खाजवतो
त्त्वचा लयच उल्ली म्हणून थंडीला दोष देतो

पोटभरून नाश्ता करून, बाप गावात जातो

ढेरीवरून हात फिरवत हत्तीसारखा चालतो
वजन वाढलं म्हणून मनात बोलत असतो
संडे म्हणजे मजा समजतो आणि नॉनव्हेज आणतो
आपापली एक पुरेशी म्हणून, गुपचूप घेऊन येतो
एकेक पेग एकटाच मारतो, चकण्याला पीस घेतो

बाप हळूहळू डुलतो, स्वर्ग पाहू लागतो
जगाचाच काय, पण स्वतःचाही त्याला विसर पडतो
बाप मस्त गुंगतो, पोट तंग होईपर्यंत खातो
दुपारी असा झोपतो की, सूर्य गेल्यावर उठतो
गावात जाऊन, फेरफटका मारून येतो
खिचडी-भजे करायला सांगून, टीव्ही पाहात राहातो

बाप ऑफिसला जातो, कामं कमी, टाईमपास जास्त करतो
सहकाऱ्याला घेऊन, शेजारच्या टपरीवर जाऊन
चहा पिला की, गुटखा खात बसतो, बाजूलाच पिचकारी मारतो
दुपारी दांडी मारून, घरी जेवयला येतो
साहेब बोलत नसतो, बाप बेफिकीर असतो
थोडी वामकुक्षी घेतो, मग ऑफिसचा रस्ता धरतो

सूर्य हळूहळू पश्चिमेला जायला लागला की

बापाला बेचैन वाटते, घरी जाण्याची घाई होते
तो घडीघडी घड्याळाच्या काट्याकडे पाहतो
काटे फटाफट पळत कसे नाही, म्हणून चडफडतो
इकडची फाईल तिकडे ठेवतो, उघडून पाहात नसतो
काट्यावर काटा आला की, घराच्या रस्त्याला लागतो

थोडं फिरून यावं की नाही ?
पण तेही बापाला सुचत नसते
बसल्या जागी सगळी सेवा हवी असते
सकाळी उठून फिरून यावे, व्यायाम करावे की नाही ?
तेही बापाला कंटाळवाणे वाटते
बसल्या जागी त्याची तब्बेत बिघडते

असाच एकदा, बाप आजारी पडला
सर्दी-पडसं-ताप म्हणून दुर्लक्ष करत गेला
नेहमीसारखं खाऊन खत करण्यातच रमला
पाच-सहा दिवसांनी दवाखान्यात गेला
तिकडे भरती झाल्याचा निरोप आला
इकडे सगळ्यांचा जीव खालीवर झाला

बाप कोरोना बाधित निघाला
तो फार घाबरला, त्याचा बिपी वाढला
बघता बघता त्याच्या अंगाला घाम फुटला
काय दुर्दैव त्याचं, मेला तिकडेच जाळला
बाप असा कसा आळशी निघाला
घरा-दाराला पोरके करून गेला

*** *** ***

३५. बेफिकीर बाप

बाप दगडासारखा स्थिर राहतो
घराला घरपण देण्याचा विचार नसतो
अन्न वस्त्र निवारा, नाही कशाचा आसरा
आईच्या भरोशावर उभा सारा डोलारा

चटणी-भाकर समोर आली की रुसतो
जिभेच्या लाडासाठी, आईशी भांडतो
मुलं मागतात काहीमाही, तर साधू-संत बनतो
बेवारस कुत्र्यासारखा इकडे-तिकडे फिरतो

बापाच्या अंगात कामधंदा नसतो
आईच्या कमाईवर डोळा ठेवतो
कधी भांडून,कधी गोड बोलून, नाही तर चोरून
आईची पर्स रिकामी करतो, एक पव्वा मारून येतो

कामधंद्याच्या शोधात फिरून फिरून थकतो
घरी येऊन एका जागी बसतो, आईवर रुबाब करतो
चिकणं-चोपडं खायला मागतो, मिळालं नाही की चिडतो
अंगात ताकत नाही म्हणतो, बहाणा करून नॉनव्हेज आणतो

भोगविलासी राजासारखा खाऊन सुस्त, राहतो मस्त
तोडक्या-मोडक्या घराला राजमहाल समजतो
बायको म्हणजे दासी आणि ओढून घेतो तिच्या कुशी
पोट भरणं, मैथुन करणं आणि रिकामं होणं
बापाचा नेहमी चालतो त्रीसूत्री कार्यक्रम

मुलांच्या भविष्याची चिंता नसते बापाला
उर्जाही नसते, त्यांच्याकडे लक्ष द्यायला
गाडी घेऊन, भटक्या पीरसारखा फिरतो
रिकामा असून मुलांकडे पाहात नसतो
त्याच्याच तालात राहतो, बाप असून परका वाटतो

मुलगी पळून गेली, तेव्हा त्याचं डोकं फिरलं
आईला बदडून काढलं, म्हणे लक्ष कुठं ठेवलं ?
मुलगा वाम मार्गाला लागतो आणि नापास होतो
बाप सारं घर, डोक्यावर घेतो, मुलाला रागावतो

चोराच्या उलट्या बोंबा मारणारा बाप
घराकडे दुर्लक्ष करतो, उलट सगळ्यांना दोष देतो
मुलांच्या बिघडण्याने डोक्याला हात लावून बसतो
निष्काळजीपणामुळे बाप घरात अडगळ वाटतो
रातकिड्यासारखी किरकिर करतो आणि शांत राहतो

आजूबाजूच्या कान्याकोपऱ्यात गोंधळ चालतो
कोणाशी घेणं-देणं नसते, शेजारी गटार वाहत जाते
डास चावले तरी, त्याला गाढ झोप लागते
बाप बिनघोर झोपतो, सकाळी आरामशीर उठतो
अवतीभोवती काही हो, काहीही चालो, बिनधास्त असतो
खोपडीतील मेंदूला ताण देत नसतो, आरामशीर राहातो
दोन टाईम पोट भरतो, शांतपणे झोपी जातो
शेजारी आग लागून खाक झाले, तरी मनाला आच लागू देत नसतो

हाडामासाच्या देहाची बापाला किंमत कळत नाही
ज्ञानेंद्रिय कशासाठी? प्रश्न काही पडत नाही
आला दिवस रेटतो, आहे त्यात सुख मानतो
परिवर्तनाचा नियम काही माहित नसतो
बेफिकीर मनाच्या तळाशी, जागृतीचा बुडून मृत्यू होतो

गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा चालतो
बाप डोळे ताणून, आवाज मोठा करून
टीव्हीवर पाहतो आणि ऐकतो
कसलीच काही हालचाल करीत नसतो

संविधानाची मोडतोड, म्हणे लोकशाही धोक्यात
शून्य असते डोक्यात, निश्चिंत पडून राहतोय
जण-सामान्यांचा आवाज दाबला जातोय
बाप डोळे लावून बीनघोर झोपतोय

*** *** ***

३६ - भ्रष्ट बाप

बापाच्या टेबलावरील फायली धूळ खातात
पैशांशिवाय साफ होत नसतात
वरवरची कमाई, बापाचा तोल जाई
पार्टी करून येतो, तसाच जोपी जातो

वाट पाहून थकलेले बायको-पोरं
जसे खुंट्याला बांधलेले ढोरं
भामट्यासारखे पाहतात, बापाला बोलत नसतात
राजाची हुकुमशाही, रात अंधारात जाई

बापाची चतुराई, लाचखोरीत पुढाकार घेई
साहेबाचा माणूस म्हणून शेकी मिरवतो
बाप खोटे बोलतो, पदाचा गैरवापर करतो
अनेकांकडून पैसे घेतो आणि तोंडाला पाने पुसतो

बाप नीतीच्या गोष्टी करतो, अनेकांकडून खंडणी मागतो
पैशांचा अपहार, तरी त्याच्या गळ्यात हार
पांढऱ्या कपड्यात, जसा बगळा दिसतो
समाधी लावून मासा पकडतो, नामानिराळा होतो

पैसा आणि वासनेच्या डोहात
बाप बुडून जातो, तरी ताठ मानेने चालतो
खोट्याचे खरे करतो, वरतून सफाईदार बोलतो
स्वतःच्या फायद्यासाठी, याले-त्याले लुबाडतो

बाप बढाईखोर, चोरावर मोर
म्याव म्याव करतो, पिसारा फुलवतो
नोकरीचे आमिष देऊन पैसे घेतो
पैसेही परत करत नाही, नुसताच फिरवतो

डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर ठेवतो
साहेबांच्या नावाने लोकांना बळी चढवतो
एकाचे दोन करून सांगतो, आशेवर ठेवतो
कामं होत नाही, तेव्हा हात वर करतो

बाप साहेबाचा हुकूम पाळतो, अनेकांडून हप्ते जमा करतो
थोडे फार खिशात ठेवतो, साहेबाच्याही हातावर तुरी देतो
रोजगार हमी, अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही, या विचारात घरी येतो
फ्रेश होऊन फ्रीज मधील बम्फर काढतो, एकेक पेग रिचवत असतो

*** *** ***

३७ - उधळ्या बाप

बाप टीव्ही पाहतो, मोबाईल चाळतो
कामात लक्ष घालत नसतो
काय करा म्हणून मनालाच प्रश्न करतो
रिकामा वेळ घालवतो आणि बेकार वाटतो

बाप नुसता वायफळ शब्द उधळतो
चारचौघात तोंडाला लगाम नसतो
तो काय सांगतो, त्याचं त्यालाच ठाऊक नसतं
बाप अर्थहीन बोलतो आणि पांचट गोष्टी करतो

अर्थाचं बोलणं आणि बोलण्याचे अर्थ
कसलाच ताळमेळ नसतो, बाकी सगळे अनर्थ उधळतो
पायाखालची वाळू सरकते, तशी त्याची वेळ निघून जाते
दिवसाचे चोवीस तास, पण बरेच कचऱ्यासारखे फेकतो

पाणी वापरावे, तसे पैसे खर्च करतो
कोणाच्या मदतीच्या वेळेस, त्याचा पगार झालेला नसतो
बाप खोटेच बोलतो, नुसती सहानुभूती उधळतो
आणि खाण्यापिण्याचं म्हटलं की खिसा गरम असतो

कोणी काही मागितलं की, रिकामे खिसे दाखवतो
स्वतःसाठी पाहिजे तशी तजवीज करतो
घराबाहेर त्याच्या हौसेला मोल नसते
आणि छंदीफंदी खर्चाला सगळी मुभा असते

म्हणे घरचं खाऊन कंटाळा येतो
फॅमिलीसह बाहेर जेवायला जातो
दोनच्या ठिकाणी चार खर्च करतो
खिसा खाली करून घरी येतो

बापाचं डोकं, जसं रिकामं खोकं, पैसा साठवत नसतो
मुठीतील पाणी सटकतं, तसं बापाचं सगळंच निसटतं
अक्कल दाढ आली, पण खाण्यासाठीच झिजली
बुद्धी नाही वाढली, जिंदगी अंधारात गेली

पगार झाला की, पैशांना बेरिंग लावतो
शॉपिंग, हॉटेलिंग व पिकनिकला जातो
चार दिवसाची मौजमस्ती करतो
दोन दिवसाचे सुख उधळतो, पुन्हा त्याच वळणावर येतो

बाप मोठा भावूक बनतो, फक्त हळहळत असतो
आंबट बोरं आणि सडक्या आंब्यासारखी माणुसकी उधळतो
आभाळाएवढ्या गप्पा मारतो, जिवलग म्हणून फुसका बार ठरतो
बापाचे तंत्र काही वेगळेच असते, सगळे फालतूच उधळले जाते

*** *** ***

३८ - वासनांध बाप

बाप खाण्याचा भुकेला, जसा दुष्काळातून आला
पहिल्या पंक्तीत गर्दी करतो, जागा आवरून धरतो
जोर लावून पोळी चुरतो, बैलाच्या दानासारखा चुरमा करतो
अन्नाची वासना बापाला उमजू देईना, थांबायचं नाव घेईना

बापाची लालसा, गगनाला जाऊन भिडते
राहायला घर असूनही फ्लॅटवर नजर असते
मौजमस्ती करण्याची, खाण्या-पिण्याची इच्छा होते
जेवण झाल्यावरही दुसऱ्याच्या ताटातील चव घेतो
बँकेत लॉकर आणि बॅलन्स ठेवतो, संपत्ती संचय करतो
पण मनासारखे खाऊन-पिऊन आनंद मिळवत नसतो

बापाची चोरटी कामना, त्याच्या नजरेला नसते मना
चालत्या बाईला खालीवर पाहतो, डोळ्यात भरून घेतो
नयन सुखाची लालसा, जसा जत्रेत पाहतो जलसा
तिरपी नजर करून मागून-पुढून पाहतो, एकेक पॉइंट डोळ्यात साठवतो

बाप काही शांत बसत नाही, खोट्या मार्गाने पैसा आणि सत्ता मिळवतो
कुसा बदलतो, सकाळची वाट पाहतो, बाईला बंगल्यावर बोलावतो

येरे येरे पैसा, पैसा आला मोठा, बायांचा गोठा, बाप झाला खोटा
बायको-मुलं म्हणजे गाय-वासरू, तो लागतो एकेकाला विसरू

कोण्या बाईनं खेळ केला, बाप वासनेच्या डोहात बुडाला
बाईच्या नजरेतील गंध, बाप बनला अंध
बाईच्या नादी लागला, जसा गायीमागे बैल रानोमाळ फिरला
रात्री घरी आला, जसा लॉजिंग-बोर्डिंग समजला

सत्ता आणि पैशांची नशा, घराची केली दुर्दशा
बाप बेधुंद बनला, सगळा संसार पांगला
पांढरा बंगला, पांढऱ्या कपड्यातला बाप
बेबोभाट करतो दिवसा-ढवळ्या पाप

म्हणे डेटिंग करतो, सेक्स वर्कर पाहतो
बाईच्या मोहानं आंधळा बनतो, ताट मानेने चालतो
अधिवेशनाच्या वेळी सभागृहात मोठा गोंधळ घालतो
त्याची सत्तेची मनोकामना, संयम काही बाळगे ना

सत्तेची नशा, करी समाजाची दुर्दशा
बापाला काही मतलब नसतो, भोगासक्त असतो
आईच्या बोलण्याला, थुंकीसारखा फेकतो
पैशांच्या जोरावर, अनेक बाया नाचवतो

*** *** ***

३९ - आंधळा बाप

बाप हाय वे ने प्रवास करतो, ऐंशीच्या स्पीडची पाटी पाहतो
भरधाव गाडी चालवतो आणि डिव्हायडरला जाऊन आदळतो
शिकलेला असूनही डोक्यात प्रकाश पडत नसतो
अकलेचा आंधळा असा कसा, डोळे असून जखमी होतो

घराच्या बाजूला कचऱ्याचा ढीग, सडका वास नाकात घुसतो
बाप नाक दाबून रस्ता ओलांडतो आणि पचकन थुकतो
कानाडोळा करून पुढे जातो, विल्हेवाटचा विचारच नसतो
घरातील घाणही तेथेच टाकायला सांगतो, घंटा गाडीची वाट पाहतो

घरासमोर गटारीचे पाणी साचते, डासांची पैदास होते
बापाची झोप उडते, तरीही बापाची बुद्धी चालत नसते
काडीने पाणी-घाण पुढे सरकवतो, मोबाईल गटारीत पडतो
नगर पालिकेच्या आरोग्य खात्याला फोन करत नसतो

इथे थुंकू नये, इथे लघवी करू नये
धूम्रपान करण्यास सक्त मनाई आहे
आपले मोबाईल बंद ठेवावे, कृपया शांतता राखावी
पादत्राणे इथे काढावे, रांगेत उभे राहावे

सार्वजनिक ठिकाणच्या वाचतो पाट्या, पण बापाच्या भुवया उलट्या
डोळे दोन आणि बुद्धी एक, करत नाही चेक, बाप नुसता फेक
गरगर डोळे फिरवतो, फक्त पाहत राहतो, डोकं वापरत नसतो
तिसरा डोळा झाकून ठेवतो, जे करायचं तेच करतो

बाप पेपर वाचतो, टीव्ही पाहतो, विचारात पडतो
महागाईचा भडका होतो, तरी भाजीला तडका द्यायला सांगतो
सिस्टिमला जाब विचारण्याचे सुचत नसते, त्याची बुद्धी गोठून जाते
बापाला डोळ्याने दिसते, पण नेणिवेची झापडी असते

रस्त्यावर गर्दी दिसली, बापाने गाडी थांबवली
अपघात झाला, कोणीतरी माणूस पडला
अरे रे म्हणत, बापाने पळ काढला
माणुसकीने आंधळा झाला, घाई-घाईत निघून गेला

आंधळं दळतं, कुत्रं पीठ खातं, बाप म्हणतो, आपलं काय जातं
कोणी नेता पैसे वाटतो, गल्लीत सगळा गोंधळ चालतो
बाप सगळ्यांकडून पैसे घेतो, एकालाच मत देतो
हक्काचा नेता कोण, बॅलेटवर पाहात नसतो
बाप डोळे असून अकलेने आंधळा असतो
आणि आयुष्यभर ताण-तणावात जगतो

*** *** ***

४० - बहिरा- मुका बाप

वर्गणी देऊन बाप मोकळा झाला, गल्लीत गणपती बसला
घराच्या बाजूला रोज डीजे वाजला, घरात भूकंप झाला
बाप बहिरा-मुका-बनला, काही न बोलता झोपून गेला
जसा कानात मळ साचला, तोंडात कोणी बोळा कोंबला

विसर्जनाच्या मिरवणुकीत, डिझेच्या गाण्यावर
बाप रंगून गेला, सोबतचा माणूस हार्टफेल होऊन मेला
डीजे वाजत राहिला, बाप नाच-नाचला, बेधुंद झाला
रात्री फुल्ल होऊन घरी आला, पोटभर खाऊन झोपला

बाप तोंडाला तेवढं काम लावतो, पोटाची सोय पाहतो
भाजीत पडलेला केस बाजूला फेकतो, खायचंच ठेवतो
लाईट गेली, फटाका फुटला, बाप हादरला
तोंड आणि कान असूनही ढोरासारखा चरत राहिला

वीज गेली, म्हणे लोडशेडींग झाली
बापाला अंधारात ठोकर लागली
त्याची वाचाच गेली, पण जीभ नाही उचलली
मुकाट्याने घराचा रस्ता धरला, खाली मान घालून गेला

पावसाचे पाणी रस्त्यावर वाहिले, घरासमोर डबके साचले
स्वच्छ भारत अभियानाची जाहिरात टीव्हीवर पाहिली
आई तापाने फणफणली, बापाने टीव्ही बंद केली
रोगाच्या साथीने डोके वर काढले, आईला दवाखान्यात नेले
कळलेच नाही बापाला, जाब विचारावा कोणाला

पाऊस पडला की घरासमोर जसा धरणाचा गाळ साचतो
येणारा-जाणारा सटकतो, धप्पकन आवाज येतो
त्याला पाहून बाप हसतो, पण सिस्टिमला बोलत नसतो
ऐकत नाही एकीचे बळ आणि दाबत नाही सिस्टिमची कळ

मुलांसाठी कोरोना देवबाप्पा ठरला
मुलगा ऑनलाईन परीक्षेत, कॉपी करून पास झाला
शिक्षणाची ऐसीतैसी, नोकरी मिळेल कशी
सुचले नाही बापाला, तो बहिरा आणि मुका झाला

अशा एक ना अनेक कहाण्या
बापाच्या पाचवीला पूजलेल्या
कितीक आल्या पिढ्या आणि कितीक खपल्या
तरी बापाला फरक नाही पडला, मेंढरासारखा जगला

*** *** ***

४१ - खुदपसंत बाप

मीच मोठा, तुझा बाप छोटा
बाप मारतो आईला, शब्दाचा गोटा
कपाळ तिचं फुटतं आणि नशीब फाटतं
सगळ्यांना धूळ समजतो, स्वतः हवेत उडतो

हे केलं, ते केलं, म्हणे मी शिखर गाठलं
दिव्याखाली अंधार आणि भ्रमाचं किटकूल निघालं
बढाईखोर बापाला ते नाही दिसलं
ग्रेट समजण्यात, त्याचं आयुष्य खपलं

बाप उंदीर मारतो, वाघाची शिकार केल्याचा आव आणतो
बाप सापाला घाबरतो आणि शिदोडाला उचलून फेकतो
कशात काही दम नसतो आणि स्वतःला दाखवण्यात पुढे असतो
मला पाहा आणि फुले वाहा, फक्त आत्मस्तुती करतो

बाप येता-जाता, आईला बावळट म्हणतो
मी कष्ट केले, तसे तुम्ही करा, मुलांना सांगतो
एक अर्ज करायचा, तर बाप विचारात पडतो
सगळ्यांना गप्प बसवतो, स्वयंम घोषित ग्रेट वाटतो

सतरा वेळा आरशात पाहातो, स्वतःला हिरो समजतो
त्याच्याशिवाय कोणीच पाहत नाही, तरी स्टेटसवर फोटो ठेवतो
कसा दिसतो, म्हणून बायकोला विचारतो
बिचारी इच्छा नसतांना सांगते, चांगला दिसतो

बाप स्तुती केल्याने खुश होतो, आत्मानंदात असतो
तिला तर खलनायक वाटतो, तरी म्हणते हिरो दिसतो
आला दिवस घालवतो, कर्तृत्त्व शून्य असतो
तरीही बाप स्वतःला महान समजतो

दिव्याला खालचा अंधार दिसत नसतो
समोरच्या माणसांना प्रकाशात पाहतो
बाप दुसऱ्यांना थर्डक्लास म्हणून हिणवतो
गाडी, बंगला, बँक बॅलन्सवर भारी भरतो

बाप दिसतो तसा नसतो, कागदी फूल असतो
इतरांना मूर्खात काढतो आणि स्वतःच हसतो
आरशात पाहतो तर, स्वतःचा चेहरा दिसत नसतो
बाप जसा डोळे लावून दूध पिणाऱ्या बोक्यासारखा वाटतो

बाप नाही खास, आहे नुसता भास
योग्यता कमी, नाही विश्वासाची हमी
बाप आत्मस्तुती करतो, स्वतःपासून दूर जातो
बेस्ट व्हर्जनचा मुखवटा, त्याला फार थकवतो

*** *** ***

४२ - कामुक बाप

सोशल मीडियाच्या ऑनलाईन जगात
तिचा चेहरा बापाच्या डोळ्यात आणि भरला मनात
तिची घातक चाल आणि बापाला वाटला माल
प्रेम समजून स्वतःला विसरला, तिच्या जाळ्यात अडकला

तिच्या डोळ्यात गहिरेपण शोधून
तिला स्पर्श करून, मनानेच घेतले सोलून
ती निसर्गाची देण, सेक्सचं जाळं टाकलं तिनं
बापाला नाही भान, समजला नाही जैवविज्ञान

सोशल मीडियाच्या सागरात, ती मासेमारीच्या नादात
काट्याला लावून सौंदर्याचा आटा, तिने अडकवला मासा
बाप देहाचा भुकेला, त्याला काटा नाही दिसला
आतुर आणि अधीर झालेला, तिच्या गळात अडकला

तिने व्हिडीओ कॉल केला, बाप तिच्या हसण्याने फुलला
माणसासारखा माणूस, ओझे वाहणारा गधा ठरला
तिचे कामुक इशारे, बापाच्या मनात हुडहुडी भरे
बुद्धिमान बाप बाईपुढे हरला, स्त्रीदेहाचा गुलाम झाला

प्रेम आणि मोह यातील फरक नाही कळला
बाप स्वतःला विसरून तिच्या चरणी गेला
क्षणाच्या तृप्तीसाठी तो बेभान झाला
तिचे मानसिक आघात, त्याचे पडले दात

भेटली सुंदर गोपी, उडाली बापाची टोपी
आत्मा शोधतो डोळ्यात, ती करते मात
कातिणीच्या जाळ्यात अडकतो, चेतनाहीन होतो
बाप वेडावून जातो, तिला प्रेमाचे दार समजतो

तिचं हसणं, गोड बोलणं, वाहणाऱ्या गटारीसारखं
बापाचा पाय सटकला आणि त्यात जाऊन पडला
तिचे अदृश्य खेळ, त्याला नाही समजले
जित की हार, नरक की मोक्षाचे दार
त्याला त्याचेच नाही कळले, घाण पाणी नाका-तोंडात गेले

माणसं जन्माला येतात आणि केव्हा तरी मरतात
वेळ-काळ त्यांची त्यांनाच माहित नसते
वासनेच्या जाळ्यात सारी जिंदगी गोलगोल फिरते
बापाला कोणी शिकवत नसते, त्याचीही तशीच फजिती होते

*** *** ***

प्रा. मनोहर सुरवाडे यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके

कव्हरवर क्लिक करताच ई पुस्तके उघडतील.

छापील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. – संपर्क- ९९७०११७४३९